# मेहता मराठी ग्रंथजगत


जून, २०२२
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष बाविसावे
अंक सहावा

The Man Booker Prize

## मॅन बुकर पारितोषिक विजेत्या साहित्यकृती


१९९७




२००८

२०२०



## प्रकाशन समारंभ

लोकप्रिय लेखिका
पद्मश्री **सुधा मूर्ती** यांच्या
**'दोन शिंगे असलेला ऋषी'**
या पुस्तक प्रकाशन
समारंभातील निवडक क्षणचित्रे



























# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जून २०२२ ◆ वर्ष बाविसावे ◆ अंक सहावा

**संपादक**

अखिल मेहता

**संस्थापक संपादक**

शंकर सारडा

**संपादन साहाय्य**

पूजा भडांगे

**अंकाची किंमत १५ रु.**

वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

**प्रसिद्धी :**

दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**

*मेहता पब्लिशिंग हाऊस*


**अनुक्रमणिका**


| | |
|---|---|
| **संपादकीय** | ४ |
| **एक एक पान घडताना...** | १० |
| **प्रकाशन** | १४ |
| **साहित्यवार्ता** | २० |
| **पुस्तक परिचय** | |
| तथागत गोतम बुद्ध | २४ |
| क्रिमिनल इन यूनिफॉर्म | ३२ |
| भक्तिचंद्र | ३६ |
| झांझिबारी मसाला | ३८ |
| पिढी दर पिढी | ४२ |
| हाउ टू किडनॅप द रिच | ४६ |
| द आर्ट ऑफ क्रिएटिव्ह थिंकिंग | ५० |
| कांद्याचा वांधा | ५२ |
| द अल्टिमेट हॅपिनेस प्रिस्क्रिप्शन | ५६ |
| **श्रद्धांजली** | ५८ |
| **दिनविशेष** | ६० |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे ४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com



'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

## संपादकीय

### बुकर आणि बरंच काही...

आंतरराष्ट्रीय साहित्य वर्तुळात अत्यंत मानाचा समजला जाणारा पुरस्कार म्हणजे 'मॅन बुकर पुरस्कार.' २०२२ मधील पुरस्कार विजेत्यांची यादी जाहीर झाली आणि भारतीय साहित्यासोबतच हिंदी साहित्य क्षेत्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला. भारतीय लेखिका गीतांजली श्री यांच्या 'रेत समाधि' या कादंबरीच्या 'टूंब ऑफ सँड' या इंग्रजी अनुवादाने पहिल्यांदाच भारतीय प्रादेशिक कादंबरीला बुकर पुरस्काराचं सन्माननीय जेतेपद मिळवून दिलं.

गेली अनेक वर्षं केवळ ब्रिटन आणि ब्रिटिश वसाहतींमधल्या इंग्रजी पुस्तकांसाठीच असणारा हा पुरस्कार २०१४ पासून जगभरातल्या इंग्रजी पुस्तकांसाठी खुला केला गेलाय. सोबतच इंग्रजीत भाषांतरित झालेल्या पुस्तकाला एक वेगळा 'आंतरराष्ट्रीय बुकर पुरस्कार' ही दिला जातो.

या पुरस्काराच्या नावामागची कहाणी जाणून घ्यायची म्हटली तर ज्या 'बुकर' कंपनीच्या नावे हा पुरस्कार दिला जातो, त्या

कंपनीनं वसाहतकाळात आफ्रिकन गुलामांचं शोषण करून पैसे कमावले. १८३३ साली ब्रिटिश संसदेनं गुलामगिरी बेकायदेशीर ठरवली, तेव्हा बुकरसहित इतर कंपन्यांनी कर्जबाजारी संसदेकडून वीस मिलियन पौंडांचं घसघशीत बेलआऊट पॅकेज मिळवलं. २००८च्या आर्थिक मंदीनंतर बेलआऊटच्या नावाखाली जो पैसा उधळला गेला, त्याआधीचा हा जगातला सर्वांत मोठा बेलआऊट होता. नंतर बुकर कंपनीच्या गयानातल्या उसाच्या मळ्यांवर ह्या गुलामांच्या बदली भारतातून कष्टकरी आणले गेले आणि त्यांच्या प्रवासाचा खर्च ब्रिटिश संसदेनं वेगळा उचलला. गयानातल्या सर्व कंपन्यांसाठी मिळून तेव्हा सुमारे अडीच लाख भारतीय कष्टकरी 'आयात' केले गेले.

शोषणाचा हा वसाहतकालीन इतिहास सार्वजनिक आहे. त्यातच, इंग्रजी साहित्यव्यवहारात दीर्घ काळ गौरवर्णीय पुरुषांचं वर्चस्व होतं. पण हळूहळू का होईना हे चित्र बदललंय. पुरुषांसोबतच स्त्री लेखिकांनी 'बुकर'वर आपलं नाव कोरून नवा इतिहास रचलाय. हिलरी मँटेल, एलीनॉर कॅटन, मार्गरिट वूड, अरुंधती रॉय आणि आता गीतांजली श्री यांच्यासारख्या दिग्गज लेखिकांनी 'बुकर'वर आपला ठसा उमटवलाय. यापैकी हिलरी मँटेल या दोनवेळा बुकर पारितोषिक मिळालेल्या एकमेव स्त्री लेखिका असून बुकर पारितोषिक मिळवणाऱ्या सगळ्यात दिग्गज लेखिकादेखील आहेत. त्यांच्या एका नव्या कादंबरीच्या प्रकाशनानंतर मध्यरात्री पुस्तकांची दुकानं उघडली गेली आणि पहिल्या तीन दिवसांतच ९५,००० प्रती विकल्या गेल्या होत्या, ही घटनादेखील जागतिक तसेच स्त्री साहित्य वर्तुळात अतिशय महत्त्वाची आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित केल्या गेलेल्या अरुंधती रॉय लिखित आणि अपर्णा वेलणकर अनुवादित 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्स' या पुस्तकाला १९९७ मध्ये, अरविंद अडिगा लिखित आणि लीना

सोहोनी अनुवादित ‘द व्हाईट टायगर’ला २००८मध्ये आणि २०२० मध्ये डग्लस स्टुअर्ट लिखित आणि डॉ. शुचिता नांदापूरकर-फडके अनुवादित ‘शगी बेन’ या पुस्तकांनाही मानाचा पुरस्कार मिळाला आहे. पुरस्काराच्या यादीत समाविष्ट होताच पुस्तकाचा खप कितीतरी वाढतो आणि प्रत्यक्ष पुरस्कार मिळाल्यावर तर त्याचा प्रचंडच फायदा होतो; हे आपण ‘रेत समाधि’च्या निमिताने पाहतोच आहोत. त्यामुळे ‘बुकर’ला ग्रंथव्यवसायात महत्त्व आहे.

वाचकांशी आवड जोपासत, सातत्याने आम्ही नवनवीन पुस्तके आपल्यापर्यंत घेऊन येतच असतो. याहीवेळी वैविध्यपूर्ण विषयांचा खजिना असेलली पुस्तके आपल्या भेटीस घेऊन आलो आहोत. ज्यामध्ये संजय सिंग आणि राकेश त्रिवेदी लिखित मुकुंद काळे अनुवादित ‘क्रिमिनल्स इन यूनिफॉर्म, उमेश कदम लिखित ‘झांझिबारी मसाला’, मंजुश्री गोखले लिखित ‘भक्तिचंद्र’, वसंत गायकवाड लिखित ‘तथागत गोतम बुद्ध’, ओशो लिखित आणि स्वाती चांदोरकर अनुवादित ‘कृष्णरंग सावळा’, राहुल रैना लिखित आणि अक्षय कुऱ्हे अनुवादित ‘हाऊ टू किडनॅप द रिच’, नंदिनी देशमुख लिखित ‘कांद्याचा वांधा’ आणि पर्ल बक लिखित आणि भारती पांडे अनुवादित ‘पिढी दर पिढी’ या पुस्तकांचा समावेश आहे.

आशा आहे की आमच्या पुस्तकांवरचा तुमचा स्नेह अबाधित राहील.



# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

**आमच्या छापील अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

**डिजिटल अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

***Available on***

play.google.com / store / books

www.amazon.in

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

**९४२०५९४६६५**

# मेहता पब्लिशिंग हाऊस

BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किमतीत मिळवा!

## टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

**टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!**

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक - G Pay +91 94223 23039

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी,
सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ.
विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

amazon    GET IT ON Google Play    Get it on Apple Books

यांच्या संयुक्त विद्यमाने
नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

**eBooks**

**www.amazon.in**

**play.google.com**

**https://books.apple.com**



**Online** पुस्तके खरेदी करा    **www.mehtapublishinghouse.com**

## एक एक पान घडताना...

–अनिल मेहता



*लेखक आणि वाचकांतील दुवा कायम जोडलेला असावा हा मुख्य उद्देश डोळ्यांसमोर ठेऊन प्रकाशन संस्थेत अनेक नवनवीन योजना आणि उपक्रम राबवण्यात आले. टी. बुक क्लब, लेखकांचे वाढदिवस, पुस्तक प्रदर्शन आणि मेहता मराठी ग्रंथजगत यासारख्या उपक्रमांना आजवर जे यश मिळतंय त्यामागची कहाणी समजून घेऊया या विशेष लेखात...*

### १०. वाचकांसाठी नवनवीन योजना व वाचनसंस्कार

सुनील केवळ कल्पना करत बसत नाही, त्याच्याकडं नवनवीन योजना राबवता येण्याची हातोटी आहे. त्यानं बऱ्याच प्रकारच्या नव्या योजना सुरू केल्या.

आम्ही आमच्या सर्वच लेखकांचा वाढदिवस आगळ्यावेगळ्या पद्धतीनं साजरा करतो. तो लेखक जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहोचावा यासाठी ज्या दिवशी त्या लेखकाचा वाढदिवस असेल त्यादिवशी त्याची सर्व पुस्तकं ४५ ते ५०% कमी दरानं दोन दिवसांसाठी विकतो. लेखक पुस्तक लिहितो, पण त्याला खरा आनंद तेव्हाच होतो जेव्हा त्याची पुस्तकं वाचली जातात, त्याच्या पुस्तकांची समाजाकडून दखल घेतली जाते. त्याच्या

वाढदिवशी आम्ही लेखकाला व त्यानिमित्तानं वाचक वर्गालाही खूश करतो. माहिती तंत्रज्ञानाच्या या युगामध्ये वाचन संस्कृती रुजवण्याचं काम हे प्रकाशकांनी आवर्जून केलं पाहिजे, असं आम्हाला वाटतं. त्यानंतर आम्ही दर महिन्याला त्या-त्या महिन्याच्या आद्याक्षराच्या नावाची पुस्तकंही सवलतीत देतो. उदा. सप्टेंबरमध्ये एस / स हे अद्याक्षर असलेले मेहता पब्लिशिंग हाऊसचे 'स्वामी' व इतर पुस्तकं.

प्रकाशन व्यवसाय हा केवळ पुस्तक प्रकाशन करणं आणि पुस्तकांची विक्री करणं एवढ्यापुरता मर्यादित न राहता तो अधिक व्यापक व्हावा, असं आम्हाला वाटतं. आम्ही जगभरातील पुस्तकं मराठीत आणत आहोत, पण ती वाचण्याची गोडी वाचकांना लागली पाहिजे. अनुवादित साहित्य अधिकाधिक वाचकांपर्यंत जावं म्हणून आम्ही टी. बुक क्लब योजना सुरु केली. टी बुक क्लबचे सभासदत्त्व रूपये पन्नास भरून घेता येते. आमची नवीन पुस्तकं प्रकाशित होताच वाचकांना त्यासंबंधीची माहिती कळवली जाते. या योजनेत आम्ही ललित साहित्याची अनुवादित पुस्तकं वाचकांना निम्म्या किमतीत देतो. तसेच आमच्या प्रकाशनाची इतर पुस्तकंही सवलतीत देतो. महाराष्ट्रात अशी योजना फक्त 'मेहता पब्लिशिंग हाउस'च राबवते. त्यामुळं मराठी वाचकवर्गात आमची प्रकाशनं लोकप्रिय झालेली आहेत. या टी. बुक क्लब योजनेतील चार -सहा अनुवादित पुस्तकं जरी वाचली तरी असं दिसून येईल की मानवी जीवनातील संघर्ष, नाट्य, वेगळेपण, मानवी मनाची ताकद ज्यात उत्तम रितीनं व्यक्त झालेली आहे, अशीच आशय संपन्न पुस्तकं आम्ही अनुवादासाठी निवडली आहेत. देशोदेशीच्या संस्कृतीचा, माणसांचा त्यांच्या प्रगतीचा, वेगळेपणाचा परिचयही या पुस्तकांमधून घडतो आणि ज्ञानात व्यापक स्वरुपात भर पडते. त्यामुळं चिंतनशील, सखोल वाचक मनाला चालना मिळते.

आज या टी. बुक क्लबचे पाचशे सभासद कायमचे ग्राहक आहेत. त्यामुळं या प्रकाशनाचा आणि वाचकवर्गाचा 'प्रत्यक्ष सबंध' प्रस्थापित झालेला आहे. क्लबचा वाचकवर्ग नियमित झाल्यानं वाचकांचा वाचनाचा छंद वाढत गेला. त्यातून तो अनेक भाषांतरित पुस्तकं जशी खरेदी करून वाचू लागला, तशी त्याची जिज्ञासा वाढत गेली. त्याची स्वतःची घरगुती लायब्ररी तयार होत गेली. आणि ती घरातील एक महत्त्वाचा ऐवज, घराचा एक अलंकार ठरली. त्याचा घरादाराला अभिमान वाटू लागला. घरादारावर वाचनाचे उत्तम संस्कार घरबसल्या होऊ लागले. हे वाचक आम्हाला

इंग्रजीतील निरनिराळी पुस्तकं भाषांतरासाठी सुचवतात. त्यातील आशय सांगतात. त्यातूनही आम्ही अनेक नवी पुस्तकं अनुवादित केली. परिणामी आमच्याकडं अनुवाद करणाऱ्या अनुवादक लेखकांची एक फळीच्या फळी मराठीत निर्माण झाली आहे.

पुण्या-मुंबई बाहेर अजूनही चांगली पुस्तकं मिळत नाहीत. त्यासाठी महाराष्ट्रभर आम्ही पुस्तक प्रदर्शनं लावत असतो. दरवर्षी साहित्य संमेलनात सर्वात मोठं दालन आमचं असतं. साताऱ्यात दरवर्षी पुस्तकमेळा असतो. तिथं असतोच. खास प्रदर्शनासाठी म्हणून पुस्तकांसाठी वेगळे पैसे आधीच काढून ठेवलेले असतात.

वाचकांना पुस्तकं वाचायची असतात, पण किंमती जास्त म्हणून ती घेता येत नाहीत. यासाठी काय करता येईल यावर आम्ही सतत विचार करत असतो. त्यातूनच आम्ही एक वेगळा पण वाचकहिताचा मार्ग शोधला. वाचकांना प्रिय अशी महत्त्वाची अनेक पुस्तकं आहेत. त्या पुस्तकांच्या किमती आम्ही जाणीवपूर्वक कमी ठेवल्या. पुस्तकांच्या किंमती ठरविण्याचं आम्ही स्वतःचं असं एक सूत्र ठरवलं आहे. त्यामुळं त्यांच्या किमती 'रिझनेबल' अशाच स्वरूपाच्या असतात. पुस्तकांचा दर्जा कायम सांभाळणं आणि योग्य किमती ठेवणं; या सूत्रामुळं आम्ही ग्राहक वर्गात, विक्रेत्या वर्गात, तसेच ग्रामीण ग्रंथालयासाठी खरेदी व्यवहार करणाऱ्या लोकांत एक आत्मविश्वास निर्माण केला आहे.

माझं इंग्रजी वाचन चांगलं आहे. बऱ्याच इंग्रजी प्रकाशकांचे हाउस मॅगझिन्स मी वाचायचो. त्यातूनच वाटू लागलं, की आता मेहता प्रकाशनाचीही एखादी स्वतःची गृहपत्रिका काढायला हरकत नाही. सातासमुद्रापारचं, वेगळ्या संस्कृतीतलं असं साहित्य मेहता पब्लिशिंग हाऊस सातत्यानं मराठीत आणते आहे, हे खरं. पण ते वाचणारा वाचकवर्गही तयार करायला हवा ना? मला त्यासाठी शंकर सारडा ही व्यक्ती योग्य वाटली. एकदा त्यांच्याशी मी बोललो की, मला हाऊस मॅगझिन सुरु करायचं आहे. त्यांना ही कल्पना आवडली. त्यांनी ती उचलून धरली व गृहपत्रिकेची जबाबदारी आनंदानं स्वीकारली. आणि २००० मध्ये आम्ही 'मेहता मराठी ग्रंथजगत' नावाचं मासिक सुरू केलं. तेव्हापासून 'मेहता मराठी ग्रंथजगत' चे संपादक म्हणून ते काम करत होते.

'मेहता मराठी ग्रंथजगत' या मासिकाची मांडणी वाचकांना आकर्षित करेल अशी केली आहे. पुस्तकाचं परीक्षण, माहिती तसेच मराठी साहित्य-

सांस्कृतिक घडामोडी या गृहपत्रिकेतून समजतात. या मासिकाच्या निमित्तानं त्यातल्या वाचकांना या महिन्यात कुठली पुस्तकं वाचावीत याचं मार्गदर्शन मिळतं. आणि त्यातनं एक वेगळी वाचक संस्कृती उत्तम प्रकारे आकाराला येते. त्यामुळं हा माझ्या दृष्टीनं मेहता परिवारातला एक अतिशय महत्त्वपूर्ण उत्तम असा उपक्रम आहे.

वाचकांच्या मनात पुस्तकांविषयीची आवड निर्माण करणे, जिज्ञासा उत्पन्न करणे हा हेतू यातून साध्य होतो. तसेच यातही ग्राहकांसाठी विशेष योजना आहे. म्हणजे सहाशे रुपये वर्गणीत पाच वर्षांचे सभासद होता येते. दर महिन्याला एक मासिक व पाच वर्ष दिवाळी अंक. शिवाय विकत घेतलेल्या प्रत्येक पुस्तकावर जवळजवळ तीस टक्के सवलत आम्ही देतो. त्यामुळं आमचे चार ते पाच हजार वाचक वर्गणीदार आहेत. अनेक सभासद आम्हाला आवर्जून सांगतात, की 'तुमची ही कल्पना अतिशय चांगली आहे.' आणि आता तर हा अंक आम्ही डिजिटल स्वरुपातही आणला आहे. कारण आज बरेच लोक मोबाईलवरही वाचू लागले आहेत.

मेहता मराठी ग्रंथजगत दिवाळी अंकास आतापर्यंत महाराष्ट्र साहित्य परिषद अ. स. गोखले स्मृत्यर्थ 'रत्नाकर पुरस्कार', मराठी वृत्तपत्र लेखक संघ, मुंबई यांच्या वतीने २००९ व ११ ला 'उत्कृष्ट अंक पुरस्कार', रोटरी क्लब ऑफ पुणे, पर्वती आणि लोकमान्य नगर तर्फे २०१० व ११ ला 'रोटरी लोकमान्य पुरस्कार', दिवाळी अंक स्पर्धा, नंदा फाऊंडेशनचा राज्यस्तरीय' दर्जेदार दिवाळी अंक पुरस्कार', दिनमार्क पब्लिकेशन तर्फे 'छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक पुरस्कार' २०१७ असे अनेक पुरस्कार मिळालेत.


तसेच प्रकाशन कार्याचाच एक नैतिक कर्तव्याचा भाग म्हणून आम्ही 'रणजित देसाई' यांच्या आठवणीसाठी त्यांच्या नावे १९९४ पासून आम्ही पुरस्कार देणे सुरू केले. वर्षभरात उत्कृष्ट ठरलेल्या मराठी साहित्यातील कथा, कादंबऱ्या आणि अनुवादित साहित्य यांना हे पुरस्कार दिले जातात. तसेच 'रुचिरा' ग्रंथाच्या लेखिका श्रीमती कमलाताई ओगले यांच्या स्मृतिप्रीत्यर्थही २००१ सालापासून पुरस्कार सुरू केला आहे. या पुरस्कारांमुळं मेहता पब्लिशिंग हाऊसची प्रतिष्ठा अधिकच वाढली.

(क्रमशः)


(श्री. अनिल मेहता यांच्या पूर्वलिखित आत्मचरित्रातून )

## प्रकाशन

### तथागत गोतम बुद्ध




‘तथागत गोतम बुद्ध’ ही वसंत गायकवाड लिखित महाकादंबरी आपल्याला बुद्धांच्या काळात घेऊन जाते. त्या काळातील समाजरचना, भाषा, राजकारण, ग्रामव्यवस्था या सर्वांचं यथार्थ वर्णन कादंबरीत आहे. हे महाकथन म्हणजे केवळ कादंबरी नसून ‘ज्ञानसाहित्य कृती आहे’ असे प्रतिपादन ‘तथागत गोतम बुद्ध’ या कादंबरीच्या प्रकाशनावेळी शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले.



शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिंदे यांनी या कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषविले. मेहता पब्लिशिंग हाऊसचे व्यवस्थापकीय संचालक अखिल मेहता देखील उपस्थित होते. हा सोहळा १६ मे २०२२ रोजी शाहू स्मारक भवन, कोल्हापूर येथे पार पडला.

## सुप्रसिद्ध लेखिका 'सुधा मूर्ती' यांच्या दोन शिंगे असलेला ऋषी या कथासंग्रहाचे प्रकाशन

लेखिका सुधा मूर्ती म्हणतात, ''जीवनात येणाऱ्या प्रत्येक संकटाशी आत्मविश्वासानं कसं लढायचं याचा वस्तुपाठ भारतीय संस्कृतीतील रामायण आणि महाभारतासारख्या महाकाव्यांतून मिळतो. या संस्कारांची आता गरज निर्माण झाली आहे. त्यासाठी संस्कारक्षम पुस्तके मुले आणि पालकांसाठी आवश्यक आहेत.''

सुधा मूर्ती यांच्या पुराणातल्या रंजक कथांचा खजिना असलेला 'दोन शिंगे असलेला ऋषी' हा कथासंग्रह २७ मे २०२२ रोजी टिळक स्मारक मंदिर, पुणे येथे दिमाखात प्रकाशित झाला. यावेळी सुधा मूर्तींसह मंचावर ज्येष्ठ अनुवादक उमा कुलकर्णी, मेहता पब्लिशिंग हाऊसचे संस्थापक अनिल मेहता आणि अखिल मेहता उपस्थित होते. पौराणिक कथा परदेशात राहणाऱ्या आपल्या नातींना कशा उलगडून सांगितल्या हे सांगता सांगता या पुस्तकलेखनाचा प्रवास सुधा मूर्ती यांनी फारच रंजक पद्धतीने सांगितला. त्या



पुढे असंही म्हणाल्या की, ''सध्या तरुण मुलं यश मिळवणारी पुस्तकं हमखास वाचतात. पण, यशाचे नेमके असे शास्त्र नसते. कष्टाची तयारी, त्यातील सातत्य, जिद्द यातूनच प्रगती होत असते.''

आधुनिक काळात छोट्या छोट्या कारणांनी आत्महत्या केल्याच्या घटना आपण ऐकतो. संकटे येतात आणि जातातही. त्यामुळे त्यांना आत्मविश्वासाने सामोरे जाणे मोठे अवघड ठरते. यासाठी रामायण आणि महाभारतासारखे ग्रंथ आणि त्यातून दिलेला उपदेश आपल्याला पथदर्शक ठरतो; आणि म्हणूनच भारतीय संस्कृतीचे हे संस्कार मुलांवर पुस्तकांच्या माध्यमातून करता येतील. कारण प्राणपणाने लढणारा योद्धा हरला तरीही तो कसा लढला हे लक्षात राहते. त्याचा पराभव लक्षात राहत नाही. कर्णाचा पराक्रम त्यामुळेच अजरामर झाला. असंही त्यांनी आपल्या भाषणात सांगितलं.

ज्येष्ठ अनुवादक उमा कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात रामायण आणि महाभारत यांना भाकडकथा म्हणून बघण्याचा दृष्टीकोन बदलला पाहिजे बदलला पाहिजे. आपल्याला जो पौराणिक कथांममधून मिळणारा बोध आणि अद्भुत रस अलीकडच्या काळातील मुलांनी आपल्या वाचनातून गमावलेला आहे याचं वाईट वाटतं. हॅरी पॉटर, बाहुबली यांना मिळणारा मोठा प्रतिसाद बघता आपण हे समजून घेतलं पाहिजे की हा आनंद घेण्यासाठी दोन शिंगे असलेला ऋषी आणि सुधा मूर्ती यांची इतर पुस्तकेही निश्चितच उपयुक्त ठरतील.

या कार्यक्रमाला प्रेक्षकांची, वाचकांची आणि सुधा मूर्ती यांच्या चाहत्यांची अलोट गर्दी लाभली असून, कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात सुधा मूर्तींच्या लहान-मोठ्या वाचकांनी त्यांच्या पुस्तकांवर सह्या घेण्यासाठी एकच गर्दी केली होती.

## 'संवादु अनुवादु' आता कन्नडमध्येही...

कानडी मराठीचा सेतू आपल्या अनुवादांच्या माध्यमातून बळकट करणाऱ्या ज्येष्ठ लेखिका आणि अनुवादक उमा कुलकर्णी यांच्या 'संवादु




अनुवादु' या आत्मकथनाचे कन्नड भाषांतर नुकतेच प्रकाशित झाले.

अखिल भारतीय साहित्य परिषद आणि समन्वय प्रतिष्ठान ठाणे यांच्यावतीने काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात 'गप्पा भैरप्पांशी' या कार्यक्रमांतर्गत हा सोहळा पार पडला.

डॉ. उमा रामराव यांनी या मूळ मराठी पुस्तकाचे कन्नड भाषांतर केले असून या सोहळ्याला ज्येष्ठ पत्रकार अरुण करमरकर, ज्येष्ठ साहित्यिक प्रवीण दवणे, अनेक मान्यवर आणि असंख्य ठाणेकर साहित्यरसिक उपस्थित होते.

## माणसाला कोर्टाच्या अगोदर बदनाम करण्याची फॅशन वाढते आहे : बाबा आढाव
## लक्ष्मण माने यांच्या 'किटाळ' पुस्तकाचे प्रकाशन

सरकार विना चौकशी निकाल न लावता वर्षानुवर्षे तुरुंगात डांबते. आताचे सरकार अशा हत्यारांचा वापर करते आहे. आताचं राजकारण माणसाला जगू द्यायचं नाही, अशा पद्धतीने चालते. या सरकारचा घटनेपेक्षा मनुस्मृतीवर विश्वास आहे आणि सामाजिक पातळीवर माणसाला कोर्टाच्या अगोदरच बदनाम करण्याची फॅशन वाढत असल्याची खंत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांनी व्यक्त केली.



पद्मश्री लक्ष्मण माने यांच्या 'किटाळ' या आत्मकथनाच्या प्रकाशन प्रसंगी ते बोलत होते. पत्रकार भवन येथे झालेल्या या सोहळ्यास ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे, निखिल वागळे, ॲड. जयदेव गायकवाड, पद्मश्री लक्ष्मण माने, प्रकाशक अखिल मेहता आदी मान्यवर उपस्थित होते.

बलात्काराच्या हत्यारांचा वापर प्रथमच नाही झाला. एखादा नव्याने वरती येणाऱ्या माणसाच्या प्रसिद्धीमुळे झालेली ही जळजळ आहे. लक्ष्मण माने यांच्यावर झालेल्या आरोपांमुळे चळवळ मंदावली. आम्ही घटनेचं नाव घेतो, पण विषमवादी संस्कृती पोसतो. त्यामुळे न्यायालयीन पातळीवर लढतानाच सांस्कृतिक पातळीवरही चळवळीची गरज असल्याची अपेक्षा बाबा आढाव यांनी व्यक्त केली.

किटाळ हे पुस्तक म्हणजे एका सामाजिक कार्यकर्त्यांचा आक्रोश आहे. पण बलात्काराच्या आरोपावेळी त्यांच्या पाठीशी न उभ्या राहणाऱ्या महाराष्ट्र पुरोगामी चळवळीची किळस वाटली. बलात्काराच्या आरोपातून एखादा लेखक पुन्हा उठणं हा त्यांचा पुनर्जन्म आहे. पण कोणतीही शहानिशा न करता मानेंवर आरोप करणं ही अनेक महिला संघटनांचीही चूक झाली. भ्रष्टाचार आणि बाकीचे आरोप करू शकत नाहीत म्हणून चारित्र्य हननाचा माध्यम म्हणून वापर केला जातो. बलात्काराचा आरोप होऊन समाजाच्या नजरा झेलत जगणं हे भयावह आहे, पण युनोच्या मानवी हक्कांच्या चार्टरवर भारताने सही केलेली असली, तरी भारतीय पोलीस कधीच त्या सूचनांचं पालन करत नाहीत. असल्याचं मत ज्येष्ठ पत्रकार निखिल वागळे यांनी व्यक्त केलं.

किटाळवर अनेक आरोप प्रत्यारोप झाले. दुर्दैवाने समाजवादी चळवळीतील सहोदर यावेळी विरोधात बोलत होते. पण लक्ष्मण माने यांनी एक कठोर परीक्षा दिली आहे, या पुस्तकात कैद्यांसंबंधी आणि मानवी हक्कांविषयी जी मांडणी आहे, ती अनुवादाच्या माध्यमातून संयुक्त राष्ट्रसंघापर्यंत पोहोचायला हवी, अशी अपेक्षा ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे यांनी व्यक्त केली.

किटाळ वाचताना प्रचंड अस्वस्थ वाटतं. इतका भयावह प्रवास लक्ष्मण माने यांनी अनुभवला. प्रगत समाजाच्या लोकांना अजूनही आमच्याबद्दल तिरस्कारच वाटतो का? लक्ष्मण माने यांना जाळ्यात अडकवण्याचा जो प्रयत्न झाला त्याचं कोडं अजूनही सुटलं नाही. त्यामुळे एवढे मानवी अधिकार मिळाल्यानंतरही जे डावललं जातं, हे दुर्दैवी असल्याची खंत ॲड जयदेव गायकवाड यांनी व्यक्त केली.

पिढ्यानपिढ्याची अस्पृश्यता सहन केली. पण पद्मश्री मिळाल्यानंतर मला पुन्हा हागणदारीत ढकलण्यात आलं, त्यावेळी केवळ बाबा आढाव आणि शरद पवार यांनी पाठबळ दिलं, माझ्यावर कायद्यानेही अन्याय केला. हा अतिशय वाईट काळ होता, तेव्हा आत्महत्या करण्याचे विचार येत होते, पण त्याच काळात मला बुद्ध भेटला, असं मत पद्मश्री लक्ष्मण माने यांनी यावेळी बोलताना व्यक्त केलं.

यावेळी अखिल मेहता यांनी प्रास्ताविक केले, तर दीपक म्हस्के यांनी सूत्रसंचालन केले.






## हिंदी लेखिका गीतांजली श्री यांच्या 'रेत समाधि' या कादंबरीच्या अनुवादाला बुकर पुरस्कार

भारतीय भाषिक कादंबरीच्या अनुवादाला आंतरराष्ट्रीय बुकर पारितोषिक मिळण्याचा ऐतिहासिक क्षण हिंदी लेखिका गीतांजली श्री यांच्या पुस्तकामुळे लाभलाय. त्यांच्या 'रेत समाधि' या कादंबरीचा डेझी रॉकवेल यांनी केलेला 'टूम्ब ऑफ सॅण्ड' हा अनुवाद पुरस्कारासाठी निवडण्यात आला होता. आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजत असलेले समकालीन पोलिश, दक्षिण कोरियाई आणि जपानी साहित्यिकही या पुरस्काराच्या स्पर्धेत होते. बुकर पुरस्काराच्या दीर्घ यादीत 'टूम्ब ऑफ सॅण्ड'सह वेगवेगळ्या ११ भाषांतून अनुवादीत १३ पुस्तकांचा समावेश होता. हा पुरस्कार मूळ लेखिका आणि अनुवादकामध्ये विभागून देण्यात येतो.

उत्तर प्रदेशातील मैनपुरीत जन्मलेल्या गीतांजली सध्या दिल्लीत वास्तव्याला आहेत. गीतांजली यांची 'रेत समाधि' ही पाचवी कादंबरी असून त्यांनी अनेक लघुकथाही लिहिल्या आहेत. त्यापैकी अनेक इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, कोरियन भाषांमध्ये अनुवादित झाल्या असून त्यांच्या दोन कादंबऱ्या इंग्रजीत




आल्या आहेत, शिवाय भारतीयता आणि डावेपणा यांच्यातला दुभंग प्रेमचंदांच्या साहित्यात कसा दिसतो, हे सांगणारा प्रबंध त्यांनी इंग्रजीत लिहिला, तोही ग्रंथरूप झाला आहे. आंतरराष्ट्रीय पुरस्काराने भारतीय आणि हिंदी साहित्याच्या शिरपेचात तुरा खोचणाऱ्या गीतांजली श्री यांचे मेहता परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन.

### मराठीमधलं पहिलं छापील पुस्तक

(भगवतगीता म्हणजे जीवनाचं सार सांगणारा ग्रंथ. हा ग्रंथ पूर्वी देवनागरीत नव्हता. पण सांगलीतल्या मिरजेमध्ये पहिल्यांदा देवनागरी भाषेत हा ग्रंथ मुद्रित करण्यात आला. तर जाणून घेऊया या मुद्रणकलेचा इतिहास आणि मिरजेतल्या देवनागरीमध्ये छापलेल्या भगवतगीतेचा... )

महाराष्ट्रातला सांगली जिल्हा हा कलावंतांची भूमी म्हणून ओळखला जातो. पण याच सांगलीत मुद्रणकलेचा सुद्धा इतिहास आहे. सांगली जिल्ह्यातील मुद्रणकलेला २१० वर्षांचा इतिहास आहे. १८२१ साली सांगलीत चिंतामणराव पटवर्धनांच्या प्रयत्नांनी छापखाना सुरु करण्यत आला. यात धर्मग्रंथ तसेच वैद्यकीय ग्रंथ इ. छापण्यात आले होते. १८८१, १८८३ आणि १८९५ साली अनुक्रमे तासगाव, इस्लामपूर व तासगाव येथे अनेक वर्तमानपत्रे व मासिके छापणे सुरु झाले. १८८० सालापासून सांगली जिल्ह्यात मुद्रणकला अधिक विकसित झाली.




पूर्वीच्या काळात ही गीता हस्तलिखित स्वरूपात होती. नंतर मुद्रणकलेचा शोध लागल्यानंतर ती अनेक भाषेत मुद्रित झाली. पूर्वी रोमन लिपीत असणारी ही गीता १८०५ मध्ये देवनागरी भाषेत मुद्रित झाली. पहिली देवनागरी भाषेतील मुद्रित गीतेची प्रत मिरजेत असून त्याला तब्बल २१५ वर्षे झाली आहेत.

या भगवतगीतेच्या शेवटच्या पानावर मुद्रणाच्या स्थळ कालाचा उल्लेख केला आहे. देशातील पहिले देवनागरी मुद्रण १८०५ मध्ये मिरज येथे झाले. या पहिल्या मुद्रणाने जिल्ह्यात मुद्रणकलेची मुहूर्तमेढ रोवली गेली. त्यानंतर जिल्ह्यात विविध भागात मुद्रणालये स्थापित झाली. भारतीय मुद्रण कलेचा अमूल्य ठेवा असणाऱ्या या ग्रंथाच्या अभ्यासासाठी महाराष्ट्रासह जर्मनी, जपान, फ्रान्स, अमेरिका या भागातून अभ्यासक भेट देतात. मिरज इतिहास संशोधन मंडळाकडे असलेली ही दुर्मिळ प्रत यापुढेही वर्षानुवर्षे जपण्याची गरज आहे.

संशोधक मानसिंग कुमठेकर म्हणतात की, 'मिरज संशोधन मंडळाकडे असलेली गीतेची ही भारतातील देवनागरी लिपीतील पहिली प्रत आहे. हा राष्ट्रीय ठेवा आहे. जगभरातील अनेक संशोधक ही प्रत पाहण्यासाठी येतात. यापुढेही अभ्यासकांना ती प्रत उपयोगी पडणार आहे.'

इसवीसन १८०५ मध्ये बंगालमध्ये श्रीरामपूर येथे विल्यम कॅरे याने देवनागरी लिपीमध्ये ग्रामर ऑफ मराठा लँग्वेज प्रसिद्ध केले होते. याच वर्षी पुण्यात सवाई माधवरावांच्या दरबारात असलेला इंग्रज वकील चार्ल्स मॅलेट याने येथील एका तांबट कारागिराला तांब्याच्या पत्र्यावर मुद्रण करण्यास शिकविले. त्याच्याकडून त्याचवर्षी देवनागरी लिपीतून छापैस प्रारंभ होणार होता. हे समजल्यावर या १८०५ मध्ये श्रावण महिन्यामध्ये ब्राह्मण भिक्षुकांना दान देण्यासाठी १०० प्रती छापल्या होत्या. त्यातील ९९ प्रती नष्ट झाल्या आहेत. (त्या प्रती कुठे आहेत त्याची कल्पना कुणालाच नाही.) त्या १०० प्रतींपैकी भगवतगीतेची शेवटची प्रत सध्या मिरज इतिहास संशोधन मंडळाकडे आहे.

– (बोल भिडू वरून साभार)


**२री आवृत्ती**




साक्षी


**डॉ. एस. एल. भैरप्पा**

अनुवाद

**उमा कुलकर्णी**

सत्या-असत्याच्या कल्पनांपुढे आव्हान उभी करणारी
ज्येष्ठ लेखक एस.एल.भैरप्पा यांची साहित्यकृती..

**किंमत : ४३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




## तथागत गौतम बुद्ध

**वसंत गायकवाड**

*राजपुत्र सिद्धार्थ ते तथागत गौतम बुद्ध या दीर्घ मनोप्रवासाचं प्रत्ययकारी चित्रण*

अडीच हजार वर्षांपूर्वी अस्तित्वात असलेल्या कपिलवस्तू या वैभवसंपन्न गणराज्यावर शाक्य कुलातील महाराज शुद्धोदन राज्य करीत होते. महामायादेवी आणि प्रजापतिदेवी या दोघी भगिनी त्यांच्या पत्नी होत्या. महाराणी महामायादेवी या त्यांच्या प्रथम पत्नी. शुद्धोदन महाराज

आणि महामायादेवी वार्धक्याकडे झुकायला लागले तरी त्यांना अपत्यप्राप्ती झाली नाही; पण वयाच्या छप्पनाव्या वर्षी महामायादेवींना गर्भधारणा झाली आणि वैशाख पौर्णिमेच्या दिवशी लुंबिनी वनात त्यांनी एका सुंदर बालकाला जन्म दिला. त्याचं नाव ठेवण्यात आलं सिद्धार्थ; पण सिद्धार्थच्या नामकरणानंतर दोनच दिवसांनी महामायादेवींनी या जगाचा निरोप घेतला. मग प्रजापतिदेवीच त्याच्या आई झाल्या.

सिद्धार्थच्या जन्माआधी आणि जन्मानंतरही तो एक तर चक्रवर्ती राजा होईल किंवा तथागत, बुद्ध होईल असं भविष्य ब्राह्मणांनी वर्तवलं होतं. त्यामुळे महाराज शुद्धोदन चिंतित होते. सिद्धार्थला सर्व विद्या आणि युद्धकलेचं जन्मजात बरंच ज्ञान होतं; त्यामुळे सगळ्यांत तो लवकरच पारंगत झाला; मात्र वैराग्याकडे असलेला त्याचा कल त्याच्या वागण्याबोलण्यातून सदैव जाणवत असे आणि महाराज शुद्धोदनांना चिंतेत टाकत असे. त्यामुळे सिद्धार्थला जास्तीत जास्त सुखोपभोग मिळावेत, तो त्यात रममाण व्हावा आणि सर्वसंगपरित्यागाच्या विचारापासून परावृत्त व्हावा, यासाठी महाराज शुद्धोदन सदैव प्रयत्नशील होते. यशोधरेशी त्याने विवाह करावा म्हणूनही शुद्धोदन महाराज आणि प्रजापतिदेवींना खूप कष्ट घ्यावे लागले. यशोधराशी विवाह झाल्यावरही सिद्धार्थ अलिप्तच होता; पण विवाहानंतर बारा वर्षांनी अपत्यप्राप्तीसाठी तरी सिद्धार्थने तिच्या जवळ यावं, अशी सलज्ज विनवणी यशोधराने केली. फक्त एकदाच सिद्धार्थने 'ते' सुख तिला दिलं आणि तिला गर्भधारणा झाली.

दरम्यान, वृद्ध, रोगी माणूस, प्रेत आणि परिव्राजक या चार गोष्टींचं दर्शन सिद्धार्थला झालं आणि सर्वसंगपरित्यागाचा त्याचा निश्चय पक्का झाला. एकदा शाक्य संघाच्या कोलियांबरोबरच्या (प्रजापतिदेवी, यशोधरा कोलिय कुलातील होत्या.) युद्धाला विरोध केल्यामुळे सिद्धार्थला देशद्रोही ठरवून त्याला देशत्यागाची शिक्षा सुनावण्यात आली आणि ती त्याने मान्य केली; पण शिक्षेची अंमलबजावणी काही काळासाठी स्थगित करण्यात आली. तरीही सिद्धार्थ देशत्यागाच्या मुद्द्यावर ठाम होता. म्हणून महाराज शुद्धोदनांनी महालाभोवतीचा पहारा खूप कडक केला. त्याच दरम्यान यशोधरा प्रसूत होऊन पुत्रजन्म झाला (त्याचं नामकरण नंतर राहुल असं करण्यात आलं.) आणि पुत्रजन्मानंतर काही तासांतच सिद्धार्थ सारथी छन्नला बरोबर घेऊन आपल्या आवडत्या कंठक या घोड्यावर स्वार झाला आणि

त्याने गृहत्याग केला.

गृहत्यागानंतर राजवस्त्रांचा, अलंकारांचाही त्याने त्याग केला. केसांचे मुंडण केले आणि ज्ञानप्राप्तीनंतर पुन्हा कपिलवस्तूला येण्याचे आश्वासन छन्नला देऊन तो मार्गस्थ झाला. छन्न, कंठक घोड्यासह कपिलवस्तूला परत आला. सिद्धार्थचा प्रवास सुरू झाला. प्रथम साकी नावाच्या एका ब्राह्मण योगिनीचा आश्रम, नंतर पद्मा नावाच्या एका ब्राह्मण योगिनीचा आश्रम, त्यानंतर रैवत आणि राजक या दोन ब्राह्मण ऋषींचा आश्रम, नंतर भृगु ऋषींचा आश्रम, नंतर आळार कालाम मुनींचा आश्रम, त्यानंतर योगगुरू उद्दक रामपुत्त यांचा आश्रम असा त्याचा प्रवास सुरू होता. मात्र त्याचा हा प्रवास हालअपेष्टांचा होता. त्याच्या पायात पादत्राणं नसल्यामुळे पायात काटे रुतत होते, काही ठिकाणी डोंगराळ, खडकाळ जमिनीमुळे पायाला जखमा होत होत्या. झाडपाल्यांचं औषध लावून तो तसाच पुढे चालत होता. नदी, ओहळ मिळेल त्या ठिकाणी स्नान करणे, भिक्षा मागून खाणे आणि रात्री एखाद्या धर्मस्थळात किंवा पडक्या इमारतीत आश्रयाला जाणे, असा त्याचा दिनक्रम होता. दरम्यान, कपिलवस्तूचे महामंत्री उदयीन आणि राजपुरोहित त्याचा शोध घेत आले आणि कपिलवस्तूला परतण्याविषयी त्याचे मन वळविण्याचा अटोकाट प्रयत्न त्यांनी केला; पण सिद्धार्थ आपल्या मतावर ठाम राहिला.

या प्रवासात विविध मुनींशी, तपस्व्यांशी त्याची तत्त्वज्ञानात्मक चर्चा झाली; पण कोणतंच तत्त्वज्ञान त्याला रुचलं नाही. याच प्रवासात राजगृह येथे राजा सेनिय बिंबिसारशी त्याची भेट झाली. त्यानंतर ग्रुध्रकुट पर्वतावर गेलेला असताना पाच परिव्राजकांशी त्याची भेट झाली. त्यांच्याकडून त्याला असे समजले की त्याच्या देशत्यागानंतर शाक्यांनी कोलियांशी युद्ध न करण्याचा निर्णय घेतला. त्या पाच परिव्राजकांच्या म्हणण्यानुसार त्याच्या देशत्यागाचे कारणच संपुष्टात आल्यामुळे त्याने कपिलवस्तूला परत जाऊन सिंहासनावर बसावे आणि राज्य करावे. हे ऐकल्यावर सिद्धार्थला आनंद झाला. काही वेळ त्याचं मन द्विधाही झालं. राज्यपदासाठी नाही, पण शाक्य आणि कोलिय यांच्यातील युद्ध टळलं, या कारणासाठी तरी कपिलवस्तूला परतावं का, असा विचार त्याच्या मनात आला; पण अखेर त्याच्या अंतर्मनाने त्याला कौल दिला की, तुला मानवजातीच्या कल्याणासाठी, पृथ्वीवर चिरंतन शांतता नांदावी यासाठी, धम्मचक्र प्रवर्तनासाठी परिव्राजक झालेच पाहिजे.’

अंतर्मनाचा असा कौल मिळाल्यावर सिद्धार्थ गया येथे गयासीस टेकडीवर गेला. तेव्हा ‘मानव मनोविकारांपासून पूर्णपणे दूर गेला तरच तो पूर्णावस्थेला पोचू शकेल आणि त्याची ही पूर्णावस्था दुसऱ्याला लाभदायक असेल, तरच तो पूर्णावस्थेला पोचला असे म्हणता येईल,’ या विचाराप्रत तो पोचला. त्यानंतर तो उरुवेला या गावाच्या परिसरात राहू लागला. या वास्तव्यात वैराग्याची परमावधी गाठण्यासाठी त्याने टप्प्याटप्प्याने अन्नत्याग, शरीराला क्लेश देणे (शरीराच्या एकाच स्थितीत, जसे उभ्या स्थितीत किंवा उकिडव्या स्थितीत बराच काळ राहणे), स्नान न करणे, झाडाच्या साली परिधान करणे, घोर अरण्यात राहणे इ. प्रकार आचरले आणि सहा वर्षांनी वैराग्याची परमावधी त्याने गाठली; पण जगातील दु:खाच्या निवारणाबाबतच्या उपायाच्या जवळपासही तो फिरकला नव्हता. तसेच या तपस्येमुळे तो इतका कृश झाला होता, की त्याचे पोट पाठीला लागले होते.

इकडे शुद्धोदन महाराज पुत्रशोकाच्या आगीत जळत होते. आपल्या पुत्राने वैराग्यासाठी आत्मक्लेशाचा मार्ग स्वीकारल्याचे कळल्यावर त्यांनी महामंत्री उदयीनना परत एकदा त्याला त्यापासून परावृत्त करण्यासाठी पाठवले होते; पण सिद्धार्थने ऐकले नाही. आत्मक्लेशाच्या मार्गानंतर सिद्धार्थच्या असे लक्षात आले की आपण ज्या अंतिम सत्याच्या शोधात आहोत त्यासाठी मनाची शांती आवश्यक आहे आणि शरीर स्वस्थ असेल तरच शांती प्राप्त होऊ शकते. म्हणून त्याने आता आपल्या आरोग्याकडे आणि आहारविहाराकडे लक्ष द्यायचे ठरवले. हा विचार पक्का केल्यावर त्याने नेरंजरा नदीत स्नान केले. त्याच्याच्याने चालवत नव्हते तरी कसाबसा चालत तो एका वृक्षाखाली बसला.

आत्मक्लेशांच्या आधी त्याने उरुवेला गावातील सेनानीकन्या सुजाताला शब्द दिला होता, की जेव्हा तो अंतिम सत्यापर्यंत पोचेल तेव्हा तो तिला अनुयायी करून घेईल आणि त्याच्या गरजांची पूर्ती करण्याचं भाग्य तिला लाभावं, ही तिची मागणीही त्याने मान्य केली होती. आता तो त्या वृक्षाखाली बसलेला असताना भुकेने व्याकुळ झाला होता. त्याचवेळी सुजाता सोन्याच्या पात्रात तांदळाची खीर घेऊन आली आणि त्या खिरीच्या सेवनाने त्याला तरतरी आली; मात्र ग्रुध्रकुट पर्वतावर त्याला भेटलेल्या पाच परिव्राजकांनी सुवर्णपात्रात खीर खाताना बघितले आणि त्यामुळे ‘तो वैराग्याच्या कसोटीस

अपात्र ठरला आहे. त्याने आपल्याबरोबर राहू नये.' असे त्या परिव्राजकांनी त्याला सुनावले आणि ते वाराणसीला निघून गेले.

त्यानंतर परत एकदा सुजाताने त्याला सुवर्णपात्रात खीर दिली. ते सुवर्णपात्र घेऊन, नावेत बसून त्याने नेरंजरा नदी पार केली. नेरंजरा नदीच्या दुसऱ्या काठावर पोचल्यावर नेरंजरा नावाच्या नागकन्येने नदीतून प्रकट होत त्याला एक आसन दिले. त्या आसनावर बसून त्याने सुजाताने दिलेली खीर खाल्ली. त्याच रात्री तो झोपलेला असताना त्याला पाच स्वप्नं पडली. त्या स्वप्नांतून त्याला ज्ञानप्राप्तीचा प्रकाश दिसणार असल्याचा संकेत मिळाला आणि तो आनंदित झाला. त्याने उरुवेला नगरी सोडली आणि तो गयाकडे जाणाऱ्या रुंद रस्त्याला लागला.

तिथे त्याच्या नजरेस एक पिंपळ वृक्ष पडला. अंतिम सत्याचे ज्ञान होण्यासाठी आपल्याला या पिंपळ वृक्षाची मदत होईल, असा विचार करून त्याने त्या पिंपळ वृक्षाखाली चिंतनास बसायचा निर्णय घेतला. तत्पूर्वी त्याने सुजाताने दिलेले सुवर्णपात्र नदीत सोडले आणि मनाशी म्हणाला, 'मला जर ज्ञानप्राप्ती होणार असेल, तर हे सुवर्णपात्र प्रवाहाच्या विरुद्ध दिशेला जाऊ दे आणि होणार नसेल तर ते नदीच्या पात्रात बुडू दे.' ते सुवर्णपात्र प्रवाहाच्या विरुद्ध बाजूला गेले. मग तो त्या पिंपळ वृक्षाकडे निघाला, तेव्हा 'मार'ने (म्हणजे मनोविकारांनी) त्याला निष्प्रभ करायचा खूप प्रयत्न केला; पण त्यावर मात करत तो त्या वृक्षाच्या दिशेने चालत राहिला. तिथे बसण्यासाठी त्याला आसन हवे होते, त्यासाठी त्याने एका शेतकऱ्याकडून गवत घेतले. नागराजा महाकालची महाराणी सुवण्णप्पभाने तिच्या अगणित नागपुत्रांसह सिद्धार्थभोवती त्याच्या संरक्षणार्थ गराडा घातला. नागकन्यांनी त्याच्यासाठी स्तुतिपर काव्य गायले. परत एकदा मारने सिद्धार्थवर जोरदार हल्ला चढवला; पण त्याला पराजित करत बोधिमंडलच्या आवारात तो पिंपळ वृक्षाखाली दृढ निश्चयाने चिंतनासाठी बसला.

ज्ञानप्राप्तीपर्यंत पोचण्यासाठी त्याला चार आठवडे ध्यान करावे लागले आणि चार पायऱ्या पार कराव्या लागल्या. पहिल्या पायरीवर तर्कशक्ती, दुसऱ्या पायरीवर पूर्ण एकाग्रता, तिसऱ्या पायरीवर मनाचा समतोलपणा आणि सावधानता, चौथ्या पायरीवर मनाची शुद्धता त्याने प्राप्त केली. चौथ्या आठवड्याच्या शेवटच्या दिवशी त्याने अंतिम सत्य जाणले **'जगात दु:ख आहे.'** अंतिम सत्याच्या प्राप्तीच्या सुखाने आकर्षित होऊन बुद्ध सात दिवस, सात रात्री त्या बोधिवृक्षाखाली बसून राहिले. त्या अत्यानंदातून स्वत:ला

जागृत केल्यानंतर बारा निदानांचे त्यांनी चिंतन-मनन केले. त्याची शृंखला अशी आहे अविद्या–संस्कार–चेतना–नाम, रूप–षडायतने–स्पर्श–वेदना –तृष्णा–उपादान–भव–जरा, वृद्धत्व, रोग आणि मृत्यू – दुःखाचे पूर्ण वर्ग. त्याचे महत्त्व जाणून बुद्ध त्या प्रसंगी उद्‌गारले, ''हा **पटिच्चसमुत्पाद (प्रतीत्यसमुत्पाद) सिद्धान्त** आहे! ज्ञानाविषयी उत्साही असलेला कोणीही जेव्हा एखाद्या घटनेचे कारणासह स्पष्ट भेद जाणतो, तेव्हा ती घटना त्याला स्पष्ट रूपात विकसित झाल्याचे ज्ञान होते. तेव्हा त्याचे सर्व संदेह, सर्व भ्रम लुप्त होतात.''

तर अशा प्रकारे सिद्धार्थ बुद्ध, तथागत झाले तरी हा सिद्धान्त लोकांपर्यंत पोचवावा की अरण्यात एकाकी संन्यासी म्हणून राहावे, याबाबत त्यांच्या मनात द्वंद्व निर्माण झाले आणि वनात एकाकी राहण्याचा निर्णय त्यांनी घेतला; पण ब्रह्मलोकातील महाब्रह्म सहम्पती यांनी बुद्धांना, त्यांचा सिद्धान्त लोकांपर्यंत पोचणे का आणि कसे आवश्यक आहे, हे सांगितले आणि त्यानंतर बुद्ध धम्मचक्र प्रवर्तनासाठी सिद्ध झाले. त्यानंतर चंद्र-छुंदजिरा-कर्णपूर-सारथी-कोहिता या गावांतून त्यांचा प्रवास झाला. त्यानंतर गंगा नदी ओलांडून ते वाराणसी शहराकडे गेले. तिथून ते सारनाथमधील इसिपतनच्या मृगदाय उद्यानात गेले. तिथे अण्णा कोण्डण्णसह पाच परिव्राजकांना धम्मचक्रप्रवर्तन करून धम्माच्या सिद्धान्तावर त्यांनी प्रवचन दिले. तसेच या पाचजणांचे धम्मांतर केले. पुढे हेच पाचजण पंचवर्गीय भिक्खू म्हणून ओळखले जाऊ लागले.

वैभवात, मद्य आणि स्त्रियांच्या उपभोगात बुडालेला आणि तरीही सुखी नसलेला यश नावाचा वाराणसीतील एक तरुण बुद्धांना भेटला. बुद्धांनी त्याला उपदेश केला आणि त्याचे हृदय पाण्याप्रमाणे शुद्ध झाले. तो अरहंत बनला. नंतर त्याचे चार मित्र आणि त्याच्या संपर्कातील पन्नास व्यक्तींनी धम्मांतर केले. त्यानंतर बुद्धांनी ठरवले की, आपल्या अनुयायांची दोन प्रकारे विभागणी करायची. भिक्खू आणि उपासक म्हणजे गृहस्थ. हा भिक्खूंचा संघ असेल. संघात प्रवेश करण्यासाठी कोणताही विधी नसेल. जातिधर्माचे, सामाजिक प्रतिष्ठेचे बंधन नसेल. तसेच अन्यही नियम बुद्धांनी निश्चित केले आणि दशबल महाकस्सपांकडे संघाचे पिता पद सोपविले.


अशा रीतीने बुद्धांच्या भिक्खू संघाची उभारणी झाली. त्यांच्या भिक्खूंची, उपासकांची संख्या दिवसेंदिवस वाढत गेली. देश-परदेशात धम्माचा प्रसार जोमाने सुरू झाला. सेनिय राजा बिंबिसार, राजा पसेनदी इ.

राजे बुद्धांचे अनुयायी बनले. तथागत झाल्यानंतर काही वर्षांनी बुद्ध कपिलवस्तूला गेले. तिथे काही दिवस राहिले. त्यानंतर बुद्धांचा चुलतबंधू आनंद, देवदत्त यांनीही धम्मांतर केले; पण देवदत्तचा धम्मांतर करण्याचा उद्देश चांगला नव्हता. त्यांच्या भिक्खूसंघात दुफळी माजवून बुद्धांना निर्बल करण्याचा त्याचा विचार होता. तसे प्रयत्नही त्यानी केले; पण महामोग्गल्लान आणि सारिपुत्त यांसारखे संघप्रमुख बुद्धांना लाभले होते, त्यामुळे देवदत्तचे प्रयत्न असफल ठरले. महाराज शुद्धोदनांच्या मृत्युसमयी बुद्ध त्यांच्याजवळ होते. महाराजांच्या मृत्यूनंतर चार वर्षांनी प्रजापतिदेवी, यशोधरा आणि शाक्य कुलातील अनेक स्त्रियांनी धम्मांतर केले. वयाच्या एकशेविसाव्या वर्षी प्रजापतिदेवी, यशोधरा (त्यावेळी वय ४४) आणि शाक्य कुलातील अनेक स्त्रियांनी बुद्धांच्या उपस्थितीत परिनिर्वाण केले. बुद्धांचा पुत्र राहुल यानेही धम्माची दीक्षा घेतली होती. बुद्धांच्या हयातीत वयाच्या पन्नासाव्या वर्षी राहुलचे परिनिर्वाण झाले. पसेनदीचा मुलगा विदुदभ याने शाक्य कुलाचा सर्वनाश केला. त्यातून दोनच शाक्य कुटुंबं बचावली.

बुद्धांच्या विरोधकांनी त्यांना नेस्तनाबूत करण्यासाठी, त्यांची बदनामी करण्यासाठी षडयंत्रे रचली; पण त्याचा काही उपयोग झाला नाही. बुद्धांचे अनेक विहार, वेळोवेळी त्यांनी केलेला उपदेश, त्यांची सुत्तं, त्यांच्या जीवनातील महत्त्वाच्या व्यक्ती, घटना इ. गोष्टींचं सविस्तर, तपशीलवार वर्णन या महाकादंबरीतून केलं आहे.

वयाची ऐंशी वर्ष पूर्ण झाल्यानंतर बुद्धांचे कुसिनाराजवळील सालवनात वैशाख पौर्णिमेच्या दिवशी परिनिर्वाण झाले. त्यांचा चुलतबंधू आनंदने त्यांची आयुष्यभर सेवा केली आणि शेवटच्या क्षणीही तो त्यांच्या जवळ होता. बुद्धांच्या अस्थि अवशेषांकरिता काही स्तूप उभारले गेले. तसेच जिथे बुद्धांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना घडल्या अशा ठिकाणीही स्तूप उभारण्यात आले.


एकूण, सिद्धार्थ ते तथागत असा प्रवास आणि त्यानंतरचा बुद्ध झाल्यानंतरचा प्रवास या कादंबरीतून कथारूपाने, तत्त्वज्ञानात्मक अंगाने उलगडला आहे. अभ्यासक आणि सर्वसामान्य वाचकांनीही तो प्रवास अनुभवावा असाच आहे.



छत्रपती शिवरायांच्या जीवनावरील
महाकादंबरीकार विश्वास पाटील यांची कादंबरीमाला
मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित
महासम्राट
विश्वास पाटील
खंड पहिला
झंझावात
छत्रपती शिवरायांच्या
जीवनावरील कादंबरीमाला
प्रकाशन पूर्व
नोंदणी
मूळ किंमत
₹५७५
सवलतीत
₹४२५
फक्त
+
पोस्टेज ₹ ४०
पृष्ठसंख्या ४५०
प्रकाशन
१ ऑगस्ट २०२२ रोजी
सवलत नोंदणी
१५ जुलै २०२२ पर्यंत
महाराष्ट्रातील सर्व प्रमुख पुस्तक विक्रेत्यांकडे नोंदणी सुरू !
मेहता
पब्लिशिंग
हाऊस
०२०-२४४७६९२४
९४२२३२३०३९
sales@mehtapublishinghouse.com
www.mehtapublishinghouse.com








# क्रिमिनल्स इन यूनिफॉर्म

**संजय सिंग** आणि **राकेश त्रिवेदी**

अनुवाद : **मुकुंद कुळे**

*देशाच्या आर्थिक राजधानीत खळबळ माजवणाऱ्या घटनेचा नाट्यमय थरार*

'स्कॅम १९९२ : हर्षद मेहता स्टोरी' ही वेब सीरिज 'सोनी लिव'वर गाजल्यानंतर, तिच्या निर्माता-दिग्दर्शकांनी त्याच सीरिजच्या

दुसऱ्या सीझनमध्ये माझ्या (संजय सिंग) ‘तेलगी स्टॅम्प स्कॅम’ या पुस्तकावर आधारित ‘स्कॅम २००३ : क्युरिअस केस ऑफ अब्दुल करीम तेलगी’ सादर करणं ही माझ्यासाठी निश्चितच अभिमानाची आणि प्रेरणादायी गोष्ट आहे... आणि आता माझं (खरं तर आमचं) आणखी एक कोरं करकरीत, रोमांचक आणि एकदम कडक ‘खास वर्दी’ची कथा सांगणारं पुस्तक तुमच्या हातात आहे.

गुन्हे-शोधपत्रकारितेच्या तब्बल दोन तपांच्या वाटचालीत आम्ही (संजय आणि त्रिवेदी) एकापेक्षा एक अशा अनेक सनसनाटी आणि अविश्वसनीय प्रकरणांचा पर्दाफाश केला आहे. एखाद्या मोठ्या प्रकरणातील सर्व रोचक पैलू, पडद्यामागे घडणाऱ्या अनेक घटना काही मिनिटांत बातम्यांमध्ये सादर करणं, हे नेहमीच कठीण काम असतं. परिणामी अनेकदा अशी अतिरिक्त माहिती लोकांसमोर न येता हवेतच विरून जाण्याची शक्यता असते... म्हणूनच अशा वेळी आपल्या आसपास घडणाऱ्या अशा अनेक कहाण्या आणि त्यातली पात्रं एका निष्पक्ष दृष्टिकोनातून लोकांपर्यंत पोचवणं ही कोणत्याही पत्रकाराची मोठी जबाबदारी असते आणि लेखकाच्या रूपातून ही जबाबदारी तो अधिक यशस्वीपणे पार पाडू शकतो. कारण अशा घटनांमधील प्रत्येक टप्प्याचा साक्षीदार असलेल्या आणि अत्यंत जवळून त्याचं निरीक्षण करत असलेल्या पत्रकारासाठी, त्याने प्रत्यक्ष पाहिलेल्या घटना आणि त्यांचा घेतलेला अनुभव... हा लेखकासाठी संशोधन, मार्गदर्शक आणि एखाद्या नियंत्रणकक्षाप्रमाणे काम करत असतो.

पत्रकारितेतील लेखनाला ‘घाईगडबडीत लिहिलेला इतिहास’ असं म्हटलं जात असेल, तर पत्रकाराने लिहिलेल्या पुस्तकाला, अभ्यासाअंती निवांतपणे लिहिल्या जाणाऱ्या इतिहासाचा पहिला खर्डाच म्हणायला हवं. कोणत्याही बातमीचं आयुष्य आणि तिचा परीघ लहान असतो. शब्द आणि वेळेच्या मर्यादेसोबतच, बातमी एवढ्या वेगवेगळ्या पैलूंमध्ये विखुरलेली असते, की अनेकदा तिच्या दोन टोकांचा अंदाजच येत नाही. मात्र पुस्तकाचं असं नसतं. पुस्तकाची एक रूपरेखा असते, एक घटनाक्रम असतो, सहजपणे समजावी यासाठी सांगितलेली सरळ गोष्ट असते... साहजिकच, लेखकाची लेखनशैली असेल आणि खोलातलं आकलन, तर पुस्तकाच्या माध्यमातून त्याच्या प्रतिभेचा अनोखा आविष्कार घडतो. अगदी गमतीत

म्हणायचं तर-बातमी ही एखाद्या उत्तेजकासारखी असते, तर पुस्तक म्हणजे उत्तेजकाने आलेल्या उत्तेजनेचं शमन... आणि हे लक्षात घेऊनच हे पुस्तक लिहिलेलं आहे. अनेकवार घेतलेला अनुभव आणि प्रत्यक्ष पाहिलेल्या घटना... यामुळेच पत्रकार-लेखक असलेल्या आम्हाला खात्री आहे, की या पुस्तकात आम्ही जी कथा रंगवली आहे आणि तिच्यात ज्या खतरनाक आणि सनसनाटी घटनांचं वर्णन केलं आहे, तशा घटनांशी माध्यमातील कुणाची यापूर्वीही कधी गाठ पडली नसेल आणि यापुढेही पडणार नाही.

या पुस्तकात अनेक सरकारी संस्था आणि तपासयंत्रणांचा उल्लेख आलेला आहे. मात्र त्यामागे, तपासयंत्रणांची बदनामी करण्याचा, लेखकद्वयीचा बिलकूल उद्देश नाही. उलट या तपासयंत्रणांनी देशाची आजवर जी सेवा केलेली आहे आणि देशासाठी जे बलिदान केलेलं आहे, त्याबद्दल त्यांना अन्य कुणी प्रमाणपत्र देण्याची गरज नाही. त्यांची प्रतिमा मुळातच एवढी उज्ज्वल आणि उच्च आहे, की काल्पनिक लेखनामुळे ती धुळीस मिळण्याची मुळीच शक्यता नाही. तसंही हजारो कर्तव्यतत्पर अधिकाऱ्यांच्या योगदानातून आकाराला आलेला गौरवपूर्ण इतिहास, दोन-चार अधिकाऱ्यांच्या कृष्णकृत्यांमुळे झाकोळला थोडाच जातो? अर्थात सुरक्षायंत्रणांमधील अधिकाऱ्यांच्या गैरकारभारावर आणि भ्रष्टाचारावर प्रकाश टाकणाऱ्या बातम्या अधेमधे येतच असतात आणि त्यांच्यावर आधारित चित्रपट व वेब सीरिजही सातत्याने बनत असतात. या पुस्तकात देखील अशाच काही अधिकाऱ्यांची गोष्ट आहे, ज्यांच्यामुळे देशसेवेसाठी बांधील असलेल्या या सुरक्षायंत्रणा नाहक बदनाम झाल्या आहेत. या भ्रष्ट अधिकाऱ्यांबद्दल सुरक्षायंत्रणा, जनता आणि राजकीय नेतृत्वामध्येही राग व नाराजी आहे... आणि लेखकद्वयाच्या मनातही तीच भावना आहे. म्हणूनच सुरक्षायंत्रणांमध्ये लपलेल्या त्या तमाम भ्रष्ट अधिकाऱ्यांसाठी हे पुस्तक म्हणजे एक चांगलाच धडा असेल, ज्यामुळे आपल्या सुरक्षायंत्रणेला बट्टा लागेल, असं कोणतंही कृत्य भविष्यात त्यांच्याकडून घडणार नाही.

याबरोबरच इतिहासात प्रत्यक्षात घडलेल्या काही घटना आणि प्रसंगांचाही हे पुस्तक लिहायला हातभार लागलेला आहे. काही घटना अशा असतात, की ज्या वरवर पाहता आताच्या वाटतात, परंतु त्यांचं गुपित भूतकाळात कुठेतरी दडलेलं असतं. मात्र प्रत्यक्ष घेतलेला अनुभव, खोलात

जाऊन केलेलं वार्तांकन आणि सूत्रांनी दिलेल्या माहितीची सुरेख सरमिसळ या पुस्तकात आहे, ज्यामुळे पुस्तकाची समयोचितता स्पष्ट होते... जी गोष्ट पहिल्या काही ओळींतच सुरू झाली आहे, तिचे धागेदोरे कुठेकुठे आणि कसे पसरलेत ते पुस्तक वाचता वाचता आपोआपच लक्षात येत जाईल. त्यासंदर्भात अधिक काही जाणून घेण्यासाठी गुगलगुरू आहेच... फक्त इशारा समजायचा अवकाश. तसंही शेक्सपिअरने म्हणून ठेवलंय की-‘नावात काय आहे?’ त्यानुसारच माणसाच्या नावापेक्षा त्याच्या कर्माकडे, म्हणजे कामाकडे लक्ष द्यायला हवं. कामच सांगत असतं, की ही व्यक्ती कोण आहे!

एक सफल संपूर्ण गोष्ट...

...तेव्हा पुस्तकाची पुरेपूर मजा लुटा.


**नवी संहिता... नवा आशय...**




पोलीस तपासाच्या चित्तथरारक कथा

**खाकी फाइल्स**


**नीरज कुमार**

माजी पोलीस आयुक्त, दिल्ली पोलीस

अनुवाद : **रोहन टिल्लू**

अंध:कारमय गुन्हेगारी अंतरंग आणि पोलिसी धैर्याची पराकाष्ठा यांचं मिश्रण असणाऱ्या, आयपीएस नीरज कुमार यांच्या कारकिर्दीतल्या अविस्मरणीय घटनांचा मागोवा

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# भक्तिचंद्र

**मंजुश्री गोखले**

*संतांच्या मांदियाळीचा कणा असलेल्या 'नामदेवा'चं संपूर्ण आयुष्य रेखाटणारी कादंबरी*

संत नामदेव. एक निस्सीम विठ्ठलभक्त. आद्य कीर्तनकार, आद्य चरित्रकार, आद्य आख्यानकर्ता, कुशल संघटक, कुशल नेता अशी नामदेवांची विविध रूपं या कादंबरीतून

भेटतात. नामदेवांचं बालपण ते त्यांच्या निर्वाणापर्यंतचा हा प्रवास अतिशय रसाळ भाषेत उलगडला आहे. नामदेवांचं कौटुंबिक जीवन. नामदेव-ज्ञानेश्वर भेट, ज्ञानेश्वरादी भावंडं, चोखोबा इ. अन्य संतांबद्दल नामदेवांना असलेला जिव्हाळा. या सर्वांसह त्यांनी हातात घेतलेली भागवत धर्माची पताका. महाराष्ट्राव्यतिरिक्त उत्तर प्रदेश, राजस्थान, पंजाबपर्यंत त्यांनी केलेली भटकंती आणि मराठीव्यतिरिक्त हिंदी, राजस्थानी, पंजाबी भाषेत केलेली अभंगरचना इत्यादीतून नामदेवांनी संत म्हणून केलेल्या अजोड कामगिरीचं दर्शन या कादंबरीतून घडतं. यवनांच्या राज्यातही मनाची सकारात्मकता कशी जपावी, हेच नामदेवांनी भक्तिमार्गातून, आपल्या कीर्तनांतून सूचित केलं आणि भागवतधर्माची पताका महाराष्ट्राच्या बाहेर पोहोचवली, हे त्यांचं महान कार्य अधोरेखित करणारी, भक्तिरसात चिंब भिजलेली प्रासादिक कादंबरी.


**६वी आवृत्ती**





आकाशाएवढ्या तुकारामांची पत्नी असूनही जमिनीवरच ठाम उभी राहिलेली, नियतीशी सतत झुंज देत, पतीकडून उपेक्षा, अवहेलना, अपेक्षाभंग हे सर्व सोसूनही अखेर त्याच्यातच विलीन झालेली ही आगळी वेगळी...

**तुक्याची आवली**

**मंजुश्री गोखले**

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# झांझिबारी मसाला

**उमेश कदम**

*आंबट, गोड, तिखट, खारट अशा सर्व चवींचं मिश्रण असणारा, कल्पनेचे पंख घेऊन जगाचा अवकाश अनुभव देणाऱ्या अफलातून कथांचा संग्रह*

'झांझिबारी मसाला' हा उमेश कदम यांचा कथासंग्रह आहे. त्यांनी आतापर्यंत लिहिलेल्या विविध कथा परदेशातील

वातावरण, वास्तव्य किंवा प्रवासादरम्यान आलेले अनुभव, भेटलेल्या व्यक्ती यांच्याशी निगडित आहेत. यांतील बऱ्याच कथा आधीच्या काही दिवाळी अंकांमध्ये प्रसिद्ध झालेल्या आहेत.

सर्वसाधारणपणे प्रत्येक कथेच्या शीर्षकातच तिचे सार दडलेले आहे. उदाहरणच द्यायचे तर... जपानी भाषेच्या संशोधनासाठी भारतातून जपानला गेलेली जुई आई-वडिलांच्या नकळत (त्यांना नाराज न करता) जपानी मित्राशी कशी विवाह करते त्याचे वर्णन 'जुई जपानला जाते' कथेमध्ये आहे. 'खंडेनवमी इन मॅनहटन' या कथेत कोल्हापूरचा धट्टाकट्टा मालोजी त्याला लुबाडू पाहणाऱ्या परदेशातील गुंडाला धूळ चारून, मॅनहटनमध्ये खंडेनवमी कशी साजरी करतो आणि त्या गुंडाला पकडण्यासाठी असलेले इनामही मिळवतो याचे वर्णन आहे. मित्राप्रमाणे समांतर जीवन जगू पाहाणाऱ्या समीरचा ते सर्व जुळून आलेला योग अखेरीस कसा फिसकटतो त्याची कथा 'समीरचे समांतर जीवन'मध्ये आहे. परदेशात लेखकाला पत्ता शोधण्यापासून शक्य ती सर्व मदत करणाऱ्या अनोळखी बिजूला (विजयला) मनात खूप इच्छा असूनसुद्धा ऐनवेळी सहायभूत ठरण्याऐवजी बाय-बाय म्हणण्याची पाळी लेखकावर कशी येते याचे वर्णन 'बाय-बाय बिजू' या कथेत आहे. पत्नीसोबत वजन कमी करण्याचे ठरवून, प्रत्यक्षात तिच्या नकळत आपल्या जिभेचे लाड (चोचले) पुरवणाऱ्याचे वजन कसे वाढत जाते तो किस्सा 'वजन कमी करण्याची गुरुकिल्ली' कथेमध्ये आहे. भाच्यासह पॅरिसला गेलेला जयवंत हॉटेलमधील एका वेट्रेसला गटवतो. रुबाबदार जयवंतच्या प्रेमात पडल्याचे भासवणारी ती वेट्रेस एक रात्र त्याच्याबरोबर राहून, त्याच्या क्रेडिट कार्डाची सर्व माहिती मिळवून त्यालाच कशी लुबाडते याचे वर्णन 'पॅरिसची पोरगी पाटलानं पटवली'मध्ये आहे. कुस्को पोलिसांनी लेखकाचा सहप्रवासी लियांगला शोधून काढून पासपोर्ट प्रामाणिकपणे परत दिल्यामुळे परदेशात त्यासाठी कराव्या लागणाऱ्या व्यापातून लियांगची कशी सुटका झाली याची माहिती 'कुस्कोचे पोलीस' कथेत आहे. किलीमांजारोचे दर्शन घेण्याची लेखकाची आत्यंतिक इच्छा दरवेळी कशी अपुरी राहते व गोरोंगोरो नेहमी रागावलेलाच का वाटतो याचे वर्णन 'रुसलेला किलीमांजारो आणि धुसफुसलेला गोरोंगोरो'मध्ये आले आहे. मिंग हुआला फक्त 'मँडरिन' ही चिनी भाषा अवगत होती; त्यातच मित्र शुनयानचे न ऐकल्यामुळे परदेशात

त्याला कोणकोणत्या अडचणींना सामोरे जावे लागले आणि शेवटी त्याची कशी सुटका झाली ही माहिती ‘डच पाहुणचार’ या कथेत आहे. उडत्या विमानातील गुन्हे, बेशिस्त व गैरवर्तनाबाबत १९६३ मध्ये करण्यात आलेल्या कराराने विमानांच्या कप्तानांना प्रवाशांमध्ये शिस्त आणि सुव्यवस्था राखण्यासाठी अमर्याद अधिकार दिले आहेत. त्याचे परिणाम, प्रभाव आणि विविध उदाहरणे हे वर्णन ‘किमया टोकियो कराराची’ कथेमध्ये आहे.

पुस्तकाला दिलेले ‘झांझिबारी मसाला’ हे नाव संग्रहातील एका कथेचे आहे. एकेकाळी भारताशी जवळचे नाते असलेले पूर्व आफ्रिकेतील झांझिबार हे ऐतिहासिक बेट तेथील वैविध्यपूर्ण मसाल्यांसाठी प्रसिद्ध आहे.

■


**नवी संहिता... नवा आशय...**




**स्थलांतर**

**उमेश कदम**

भूमध्य समुद्रातून अत्यंत धोकादायक प्रवास करून बेकायदेशीरपणे युरोपला स्थलांतर करू इच्छिणाऱ्यांच्या आयुष्यात पदोपदी घडत असणाऱ्या हृदयद्रावक, सत्य घटनांवर आधारित नाट्यमय, माहितीपूर्ण आणि उत्कंठावर्धक कादंबरी.

**किंमत : २१०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

**नवी संहिता... नवा आशय...**





# एक दिवशी

## डॉ. गिरीश वालावलकर

उद्योगसमूह, राजकारण, गुन्हेगारी आणि आर्थिक अफरातफर यांचा परस्पर संबंध अलगद उलगडत श्रीधर, चारुलता, यशवंत या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून मानवी स्वभावाचे पैलू स्पष्ट करणारी कादंबरी

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# अराजक

## विल्यम डॅलरिंपल

अनुवाद

## रेश्मा कुलकर्णी-पाठारे

हजारो मैल दूर असलेल्या कंपनीनं चार खोल्यांच्या कार्यालयातनं दोन लाख सैनिकांच्या बळावर भारतावर वर्चस्व गाजवलं. या वसाहतवादी गळचेपीत भारताची लूट केली. ईस्ट इंडिया कंपनीच्या या जुलमी कारकिर्दीचा सडेतोड विल्यम डॅलरिंपल यांनी घेतलेला धांडोळा.

**किंमत : ७९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तक परिचय




# पिढी दर पिढी

**पर्ल बक**

अनुवाद : **भारती पांडे**

*वास्तवतेच्या निखाऱ्याला नात्यांचं शिंपण...*
*वांग युआनच्या जीवनाचं भावपूर्ण चित्रण*

'अ हाउस डिव्हायडेड' या पर्ल एस. बक यांच्या इंग्रजी कादंबरीचा भारती पांडे यांनी मराठीत अनुवाद केला आहे. ही कादंबरी जवळजवळ संपूर्णपणे वांग युआन या तरुणाच्या आयुष्याचे वर्णन करणारी आहे.

युआन हा टायगर वांगचा मुलगा. मात्र, त्याच्याहून वेगळा आहे. या मुलाला अगदी आपल्या आजोबांसारखा-वांग लुंगसारखा-शेती करण्यातच रस असतो, जमिनीविषयी प्रेम असतं... एवढंच नाही तर त्याला कोणत्याही प्रकारची हिंसा, लढाई, रक्तपात बघवतही नाही. युआन पंधरा वर्षांचा झाल्यावर टायगर त्याला दूरच्या सैनिकी शिक्षण देणाऱ्या शाळेमध्ये पाठवतो. चार वर्षांनंतर युआन अचानक घरी येतो, तेव्हा टायगर आश्चर्यचकितच होतो, कारण आता युआनच्या अंगावर क्रांतिकारक सैन्याचा गणवेश असतो. त्याच्या शाळेतले शिक्षक क्रांतिकारकांना सामील झालेले असतात आणि टायगरसारख्या लढाऊ सरदारांविरुद्धच त्यांचा लढा असतो. अर्थात, क्रांतिकारकांच्या सैन्यामध्ये जाऊन स्वतःच्या वडिलांविरुद्ध जावं लागू नये म्हणून युआन लपतछपत शाळा सोडून घरी परत आलेला असतो.

ही सगळी गडबड शांत होईपर्यंत आपल्या आजोबांच्या जुन्या मातीच्या घरात, त्या खेड्यातल्या शेतकऱ्यांमध्ये लपून राहावं असा त्याचा विचार असतो. शेतावरच्या घरामध्ये युआनला कमालीची शांतता मिळते. पूर्वीची कविता करण्याची त्याची वृत्तीही तिथे पुन्हा जागी होते; पण आपण आजारी असल्याचे कारण सांगून टायगर त्याला पुन्हा घरी बोलावतो, तेव्हा युआन रागानं घराबाहेर पडतो आणि आपली सावत्र आई– जी आपली मुलगी आय-लान हिच्या शिक्षणासाठी म्हणून किनारपट्टीवरच्या एका मोठ्या आधुनिक शहरामध्ये जाऊन राहिलेली असते–तिच्याकडे जातो. तिथे युआनला आय-लान ही स्वच्छंदी व मनमोकळ्या स्वभावाची बहिण मिळते. तर अन्यायाविरुद्ध पेटून उठणारा, क्रांतीची ओढ असणारा आक्रमक असा मेंग आणि कवी मनाचा, सौम्य प्रकृतीचा; पण मौजमजेची आवड असणारा रंगेल शेंग हे चुलतभाऊ भेटतात. तसेच जमीनदार वांग आणि व्यापारी वांग या दोन थोरल्या काकांचा त्यांच्या बायका-मुलांसह परिचय होतो.

युआनची मानलेली म्हणजे सावत्र आई त्याला शिक्षणासाठी परदेशी पाठवते. त्याच्याबरोबर शेंगही परदेशात येतो; पण त्याचे मन शिक्षणापेक्षा इतर गोष्टींमध्येच जास्त रमते. युआन मात्र प्रामाणिकपणे शेतीविषयक शिक्षणात रस घेऊन शिकत राहातो. परदेशातही साधेपणा आणि संयमाने राहून शिकणाऱ्या युआनला त्याचे एक सज्जन व धार्मिक शिक्षक डॉ.

विल्सन आपल्या घरी बोलावतात. तेथे त्यांची मुलगी मेरी हिच्याशी त्याची ओळख होते. पुढे ओळखीचे रूपांतर मैत्रीत होते. मोठ्या विद्यापीठात शेतकी शास्त्राचं शिक्षण घेऊन सहा वर्षांनंतर युआन मायदेशी परत येतो आणि थेट मानलेल्या आईकडे जातो. सुदैवाने त्याच वेळी आय-लानचा प्रेमविवाह होतो. दरम्यान, आईने आश्रमातून सांभाळायला आणलेली मी-लिंग मोठी झालेली असते. शिकत असताना घरकामात आईला मदत करणारी तसेच खूप अभ्यास करून डॉक्टर होऊ इच्छिणारी शांत स्वभावाची मी-लिंग युआनला एकदम आवडते. मात्र, मी-लिंगला प्रथम शिक्षण पूर्ण करायचे असते. युआनही वडिलांचे कर्ज फेडणे आपले कर्तव्य आहे असे मानून मेंगच्या ओळखीने मिळालेली नोकरी करू लागतो.

**९वी आवृत्ती**




**विज्ञान गमती**

**डॉ. अरुण मांडे**

विज्ञानाबद्दल कुतूहल जागृत करणे हा या पुस्तकाचा हेतू आहे. या पुस्तकातील प्रयोग लहान मुलांना करता येतील असेच आहेत. त्यांतल्या उपकरणांसाठी कोणत्याही प्रयोग शाळेत जायची गरज नाही. ती घरातच सापडतील. यातले प्रयोग अतिशय सोपे आहेत. विज्ञानातले मूलभूत नियम समजून घेण्यासाठी यांचा उपयोग होईल.

**किंमत : १२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

**नवी संहिता... नवा आशय...**

पित्याची माया मुलांना संकटात देई छाया...
वडील आणि मुलांच्या नात्यातील रेशीम बंधाच्या कथा.
जीवनाचं सार मांडणाऱ्या 'चिकन सूप' मालिकेतील नवे सत्त्व








## चिकन सूप फॉर द सोल इंडियन फादर्स
## चिकन सूप फॉर द सोल इंडियन फादर्स - भाग २

**जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन**
आणि **रक्षा भारदिया**
अनुवाद
**अवंती महाजन**

**किंमत प्रत्येकी २५०रु. । पोस्टेज अतिरिक्त**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तक परिचय




# हाउ टू किडनॅप द रिच

**राहुल रैना**

अनुवाद : **अक्षय कुऱ्हे**

*बनावट परीक्षा उमेदवारांचं जाळं तयार करणाऱ्या नव्या युगातल्या रमेशची प्रसिद्धी आणि यशाची माग घेणारी कादंबरी*

रुढी ऊर्फ रुद्राक्ष सक्सेना हा गर्भश्रीमंत, लहरी व लाडावलेला मुलगा 'ऑल इंडिया' सारख्या महत्त्वाच्या परीक्षेस आई-वडिलांच्या हौसेखातर बसतो; पण ही परीक्षा देण्यास तो उत्सुक नसतो. हा मुलगा मोबाइलच्या दुनियेतच रमलेला असतो. आई-वडिलांचे प्रेम त्याच्या वाट्याला येत नसते, हे दु:ख त्याला सतत टोचत असते. आपली इभ्रत व दिखाऊपणालाच सक्सेना कुटुंब महत्त्व देते. यामुळेच रुडीचे आयुष्य बेफिकीर बनते. रुडीवर ही परीक्षा त्यांनी लादलेली असते. त्याला हे दडपण झुगारून द्यावेसे वाटते. त्यामुळे सोशल मीडिया, मोबाइल चॅटिंग व टिव्हीवर वेळ घालवून हा मुलगा आई-वडिलांविरोधी वागतो. व्यसनांना जवळ करतो. पण रुडीचे हेकेखोर आई-वडील शिक्षणक्षेत्रातील तोतयेगिरीचा शॉर्टकट शोधतात व समाधानी होतात. रमेशकुमार एज्युकेशन कन्सलटंटशी संपर्क साधतात. आई-बाप नावाजलेल्या विद्यापीठात १३ लाख रु. खर्च करून प्रवेश घेतात. मुलाच्या सुंदर भवितव्याच्या नादात पालक असा घाईने गैरमार्ग स्वीकारतात.

चहा टपरी चालवणाऱ्या मवाली माणसाचा रमेश हा गरीब मुलगा. कष्ट व बापाच्या रोजच्या माराला तो कंटाळलेला. बकाल वस्तीत गुंड, भांडखोर लोकांत त्याचे  बालपण करपून चाललेले. रमेश रोज चहाचा मसाला कुटून, बापाचा मार खाऊन, टोमणे ऐकून थकून जायचा. एका संस्थेची क्लेअर नावाची नन हे पाहते व रमेशच्या बापाला धमकावते. त्याला शाळेत पाठवायचा आग्रह धरते. रमेश लहानपणीच आईच्या मायेला पोरका झालेला. मारकुटे वडील कधीच त्याची प्रेमाने चौकशी करत नाहीत. मृत्यू झालेल्या रमेशच्या आईलाही ते शिव्या द्यायचे. क्लेअरसारख्या प्रेमळ ननचीही बदनामी करतात. ही नन मग पोलीस कारवाई करून बालकामगार कायदा दाखवून रमेशची कझाक बापापासून सुटका करते. मिशनरीच्या कॉनव्हेंट शाळेत रमेशचं शिक्षण सुरू होतं. क्लेअर उत्तम प्रकारे त्याचा अभ्यास करून घेतात. पण शाळेतले मित्र-मैत्रिणी क्लेअरचा अनौरस मुलगा म्हणून रमेशला हिडीसफिडीस  करतात. संस्थाचालकही खोट्या गोष्टींचे समर्थन करतात. शाळेतून रमेशला काढून टाकायचे मनसुबे रचतात. पण तो हुशार असतो. क्लेअरही आपल्या निर्णयावर ठाम राहतात. त्यामुळे रमेशचे कॉलेजपर्यंतचे शिक्षण पार पडते. त्यानंतर क्लेअर कॅन्सरने आजारी पडतात. त्यांना हॉस्पिटलमध्ये भेटायला एक प्रिन्सिपॉल  येतात. तेव्हा ते ट्यूशनच्या

निमित्ताने रमेशची चौकशी करतात. रमेश हुशार असल्याने ते आपल्या नातवाच्या परीक्षेला रमेशला बसवतात. रमेश हे क्लेअर यांना सांगू शकत नाही. त्यांचा अंत जवळच दिसतो. तेव्हापासूनच रमेशच्या आयुष्याची घसरण सुरू होते. त्याचं अंधारमय भविष्य त्याला रुडीकडे नेते. त्याला भरपूर पैसा मिळतो; पण जेलची वाट त्याची प्रतिमा मलिन करते.

प्रियासारखी सुंदर व बुद्धिमान मुलगी रमेशवर मनापासून प्रेम करते. लग्नाचं सुंदर स्वप्न ते बघतात. रमेशचा मित्र सुमित अभी अगरवाल या मुलाचे अपहरण करतो. यात रमेशची करंगळी निघृणपणे कापतात. रुडीला स्त्रीवेश धारण करून संकटांना तोंड द्यावे लागते. प्रोड्यूसर ओबेराय पैशाच्या हव्यासापायी रुडी व रमेश पाकिस्तानी हेर आहेत, ही अफवा पसरून गोंधळ उडवून देतो. पोलीस अधिकारी अंजली भटनागर निर्दोषत्व सिद्ध करतात. पण रमेशला शिक्षा भोगावीच लागते. तो आत्मपरीक्षण करून विचारपूर्वक निर्णय घेतो. प्रिया त्याची वाट बघते, अनेक पत्रं लिहते. पण रमेश ठाम राहतो. शिक्षा भोगून येतो व सत्कर्म करण्याचा ध्यास घेऊन टेक्सासला जातो. तेथे आपली खरी कहाणी सांगतो. भारतीय वैदिक पद्धतीने तो आपल्या आध्यात्मिक जीवनाची सुंदर बैठक उभी करतो. तेथील सर्व समदु:खी एकत्र येऊन रमेशला आपलं दु:ख शेअर करतात. तो सर्वांना मानसिक आधार देऊन क्लेअरचं आदर्श स्वप्न सत्यात आणतो. आपल्या वडीलांविषयी सुद्धा तो मनात कसलेही किंतू न ठेवता, नवतेजाने आपला मार्ग आखतो. सर्वांना धन्यवाद देतो. क्षमाशीलवृत्तीच अखेर रमेशला उच्च ध्येयाकडे घेऊन जाते.

■

**नवी संहिता... नवा आशय...**

जीवनाचं सार मांडणाऱ्या
'चिकन सूप' मालिकेतील नवे सत्त्व








**चिकन सूप फॉर द इंडियन डॉक्टर्स सोल**
**चिकन सूप फॉर द इंडियन डॉक्टर्स सोल - भाग २**

**जॅक कॅनफिल्ड, मार्क व्हिक्टर हॅन्सन**
आणि **रक्षा भारदिया**
अनुवाद
**जोसेफ तुस्कानो**

---

**किंमत प्रत्येकी २२०रु. । पोस्टेज अतिरिक्त**
**ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# द आर्ट ऑफ क्रिएटिव्ह थिंकिंग

**रॉड जड्किन्स**

अनुवाद

**डॉ. शकुंतला कोलारकर**

*बदलावी मळवाट...*
*मग होईल सर्जनशीलतेची पहाट*


‘सर्जनशीलतेचा रूढ अर्थ बदलवून टाकून, एका अगदी अभिनव संकल्पनेद्वारे सर्जनशीलतेचे अगणित पैलू लेखकानं या पुस्तकात उलगडून दाखवले आहेत. ही सर्जनशीलता – रुळलेली वाट नाकारणारी, खडतर वाटेच्या साहसपूर्ण प्रवासातून नवनिर्मितीच्या शोधाचा शुद्ध आनंद देणारी आहे. सर्जकता ही केवळ कलावंतांची मिरासदारी नाही, ती तुमच्या-आमच्यात, साध्यासुध्या माणसात दडलेली असते. आपल्या अंतरंगात डोकावून पाहा, व्यक्त होण्यासाठी ती अतीव आतुर झाल्याचं तुमच्या लक्षात येईल. बालसुलभ निरागसतेत ती बहरते; कारण प्रत्येक लहान मूल हे चैतन्यमय असतं आणि म्हणूनच ते सर्जनशीलही असतं. सर्वसामान्यांच्या आपल्याबद्दल असलेल्या अपेक्षांच्या चौकटी मोडून काढा, अपयशावर मात करा, इतर कुणाची नक्कल करू नका, कायम विद्यार्थी राहा, शिकत राहा, मनाची कवाडे सतत उघडी ठेवा, उद्दिष्ट गाठण्याची महत्त्वाकांक्षा बाळगू नका, शोधायचं कसं ते शोधा, जास्तीत जास्त अकार्यक्षम राहा, योग्य वस्तू अयोग्य जागी ठेवा... अशी अनेक चमकदार विधानं आणि त्यांचं महत्त्व त्यांनी विशद केलं आहे.

जगात आपल्या कर्तृत्वाचा दबदबा निर्माण करणारे चित्रकार, शिल्पकार, नाट्यकर्मी, चित्रपटनिर्माते, अभिनेते, लेखक, वास्तुरचनाकार, संगीतकार, संशोधक... या सर्व लोकांनी दैनंदिन घडणाऱ्या घटनांमधील वेगळेपण सदैव टिपलं आणि त्यातूनच नवनिर्मिती केली. प्रत्येक व्यक्तीत कल्पकता आहे, सर्जनशीलतेचा स्फुलिंग आहे, असा दिलासा देणारी असंख्य उदाहरणं या पुस्तकात जागोजागी विखुरलेली आहेत. चमकदार आणि चमत्कृतीपूर्ण वचनांची जणू मेजवानीच!

लेखक स्वत:च एक अत्यंत प्रतिभावान कलाकार आहे. त्यांनी अत्यंत चपखल शब्दांत विविध कलाक्षेत्रांतील उत्तुंग व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत.

■

## पुस्तक परिचय




# कांद्याचा वांधा

■

**नंदिनी देशमुख**

■

*दैनंदिन जीवनातील तगमग आणि खट्याळ नर्मविनोदी कथांचा 'नवबहार' म्हणजे कांद्याचा वांधा*

'कांद्याचा वांधा' हा हलका फुलका विनोदी कथासंग्रह. लेखिका नंदिनी देशमुख यांच्या या कथासंग्रहात एकूण १४ मार्मिक कथा

असून, प्रत्येक कथा आपल्याला जगण्याचं नवीन भान देऊन जाते. ‘सुप्त गुणांच्या शोधात’ या कथेतून आपलं हरवलेलं अल्लड बालपण गवसते. ‘ओम शांती ओम’ या कथेतून शांती व ओम हे नवतरुण-तरुणी जॉगिंगसाठी घराबाहेर पडतात. ओमला व शांतीला एकमेकांशी बोलायचे असते, पण आजूबाजूचे जेष्ठ नागरिक, हास्य क्लबला येणारी शहरी मंडळी, जाता-येता घडणारे विनोद खूप हसवतात. ‘परीकथेतील राजकुमारा’ या कथेतील गुणवान, सावळी-श्यामल मुग्धा... अर्थात स्वप्ना मनातून दु:खी असते. आई-वडील स्थळे शोधतात, पण स्वप्ना सावळी असल्याने सारखे नकार येतात. त्यामुळे ती दु:खी असते, पण नाट्यमयरित्या स्वप्नीलसारखा गोरापान व देखणा तरुण तिच्या जीवनात येतो...हास्यरहस्य मोठ्या नजाकतीने उलगडत जाते आणि रडवेली स्वप्ना आश्चर्यचकित होते व हसू लागते. ‘इये मराठीचिये नगरी’ या कथेतील नायक-नायिकांचे प्रेम जमते, नायक अमेरिकेत वास्तव्यास... तर प्राध्यापक असलेल्या सासरेबुवांच्या विचित्र अटी, शुद्ध मराठीतच बोलले पाहिजे... यांतून घडणारे खुमासदार व प्रासंगिक विनोद जगण्याचं छान भान देऊन जातात. गुलाबी रंग हा प्रेमाचे प्रतीक मानला जातो... आणि ‘गुलाबी साडीचे रहस्य’ ही कथा प्रत्येकाला स्वत:च्या तारुण्यातील हळव्या आठवणींत नेते... गुलाबी साडीच्या रहस्यातून भावनिक गमतीजमती घडतात... अहिल्याची मैत्रीण संगीता तिला शोकेसमधली गुलाबी साडी भेट देते आणि मग अहिल्याची स्वप्नेच पालटतात... कॉलेज जीवनातील मित्र-मैत्रिणी, जुन्या आठवणी, किस्से धमाल उडवून देतात. ‘चंदनाचे परिमळ’ या कथेतील आशुतोष, त्याचा प्रोजेक्ट पार्टनर-बॅचलर मित्र पवन व आशुतोषची बहीण अवनी यांची नाट्यमयरित्या भेट होते. सेंट व डीओचा परिमळ वातावरणात आनंद व गमतीदार चमत्कृती घडवून आणतो. विनोदनिर्मिती व हशा पिकतो. मग साखरपेरणी होते. ज्या पवनची घरात चेष्टा-मस्करी होते, तोच घरचा लाडका जावई बनतो. ‘साटंलोटं’ या कथेतूनही एकमेकांबद्दलचे गैरसमज नाट्यमयरित्या दूर होतात व भावनिक नातेसंबंध निकोप व जिव्हाळ्याचे बनतात. नात्यांची, एकमेकांवरील विश्वासाची श्रीमंती हीच मोलाची असते.‘कांद्याचा वांधा’ ही तर कथासंग्रहाचे शीर्षक असलेली गोष्ट खूप हसवते. कांद्यांचा भाव वधारतो, त्याची साठेबाजी सुरू होते, कांदा दुर्मिळ

होतो. अशातच आनंदराव व कुंदाताईंच्या चंदाचे लग्न गर्भश्रीमंत कुटुंबात ठरते; पण ते मुलीकडच्यांना आंदण म्हणून कांद्याचीच मागणी करतात...तुम्ही आहेर म्हणून ५-५ किलो कांदेच द्या म्हणतात. यामुळे वधू पिता घाबरूनच जातो. कांद्याची जमवा जमव व शोध सुरू होतो. लग्नात कांद्याचा वांधा होतो... नाश्त्याला, पकोडे, ओनियन उत्ताप्पा कांद्याच्या पदार्थांचीच फर्माईश होते. रुखवतावरही कांद्याची पाकिटे ठेवली जातात. फुलांच्या पाकळ्यांऐवजी कांद्याचा लाल-जांभळा-पांढरा पाचोळा पसरला जातो...कांद्याची पात सुशोभिकरणाला असतेच पण लग्न झाल्यावर एकच गोंधळ उडतो... कांद्याचे भाव धाडकन उतरतात... आणि वधूचे माय-बाप छोट्याशा घरात कांदा-भाकर खातात...'गिफ्ट' कथेतील महागड्या डीनर सेटची भेट मुग्धा व विक्रमला चांगलीच चक्रावून टाकते. 'चोरीचा मामला' मधील भैया नावाचा चोर मुकुंदराव व श्यामलताईंच्या घरात दागिने, पैसे, लॅपटॉप हा ऐवज चोरतो; पण मुकुंदराव व श्यामलताई पोलीस कम्पलेंट करत नाहीत... 'अहंकाराची भाजी' या कथेत वांग्याची भाजी अहंकार उतरवते... जमिनीवरच राहायला शिकवते. 'वदनी कवळ (कवळी) घेता' कथेतील विहिणबाईंची कवळी मजा उडवून देते... शिष्टाचार शिकवते... सन्मान व आत्मभान देते. 'चार्जर' या कथेत सरूताईंचा चार्जर हरवतो, त्यामुळ त्या अस्वस्थ होतात... पाहुण्यांची निघायची गडबड, त्यातच सरूताईंचा नातू पळत येतो... मोबाइलवर काय आलंय, हे दाखवत सुटतो...''स्वामी तिन्ही जगाचा चार्जरविना भिकारी...'' ही म्हण कुणीतरी पाठवलेली असते आणि शेवटची कथा अगदी 'शेवटचा दिस' हे औचित्य साधूनच टाकलीय. हेमलताबाईंना हृदय विकाराचा झटका येतो, सगळ्यांच्या तोडचं पाणी पळतं... डॉक्टर, नातेवाइकांची धावपळ होते. मोठ्या मुश्किलीने डॉक्टर त्यांना वाचवतात... धोका टळतो आणि हेमलताबाई म्हणतात की, माझी एकच शेवटची इच्छा आहे... मुलांना वाटतं आपल्या लग्नाची काळजी असेल आईला... पण त्यांची शेवटची इच्छा ऐकून सर्वजण धाडकन उडतातच... अवाक् होतात... काय असते त्यांची इच्छा? हे जाणून घेण्यासाठी आवर्जून वाचावा, असा 'कांद्याचा वांधा' हा कथासंग्रह. या कथासंग्रहातील प्रत्येक कथा हलकी फुलकी असली, तरी मनाची उत्कंठा वाढवणारी, विचार करायला लावून निखळ आनंद व हसायला लावणारी. ■

**नवी संहिता... नवा आशय...**





# सांगाती

## ...स्मरणझुला एका जिप्सीचा

**सदानंद कदम**

साहित्यापासून संगीत-नाट्य-कलांपर्यंत, इतिहासापासून गडकोटांपर्यंत अनेक क्षेत्रांतील दिग्गज रणजित देसाई, शिवाजी सावंत, कॅप्टन लक्ष्मी सेहगलांपासून पद्मजा फेणाणींपर्यंत अनेक प्रतिभावंतांचं जिव्हाळपण अनुभवलेल्या आणि ते शब्दबद्ध केलेल्या हरफनमौला सदानंद कदम यांची विलक्षण स्मरणयात्रा..

**किंमत : ३९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**





# ऐसी अक्षरे

**मैत्रेयी जोशी**

नियती...
मानवी मन...
नातेसंबंध...
सामाजिक परिस्थिती यांच्या संमिश्र धाग्यांतून विणल्या गेलेल्या स्त्रीकेंद्रित कथा

**किंमत : २१०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# द अल्टिमेट हॅपिनेस प्रिस्क्रिप्शन

**दीपक चोप्रा**

अनुवाद

**सुमिता बोरसे**

*सात मार्ग अनुसरावे...*
*आनंदाच्या गावा जावे*

जीवनाचा हेतूच आनंदाचा विस्तार करत जाणे आहे. प्रत्येक ध्येयाचे ईप्सित आनंदप्राप्ती हेच असते. या आनंदातून अंतिमत: मोक्ष मिळावा अशीही प्रत्येकाची इच्छा असते. या पुस्तकाचे लेखक दीपक चोप्रा यांनी आनंदप्राप्तीसाठी सात गुरुकिल्ल्या (अर्थात सात सहजसुलभ मार्ग) वाचकांच्या हाती दिल्या आहेत. या सात गुरुकिल्ल्या आहेत - स्वत:च्या शरीराचा परिचय करून घ्या, तुमच्या खऱ्या आत्मविश्वासाचा शोध घ्या, तुमच्या जीवनातून अशुद्ध तत्त्व काढून टाका, बरोबर असणं सोडून द्या, वर्तमानावर लक्ष केंद्रित करा, स्वत:मध्ये जग पाहा, मोक्षप्राप्तीसाठी जगा. या सातही मार्गांचे लेखकाने सविस्तर विवेचन केले आहे. दैनंदिन जीवनात त्याचा वापर करून प्रत्येकजण आनंदी होऊ शकतो. अशा प्रकारे  सर्वजण सुखी झाल्याने अवघं जग (विश्व) आनंदमय होईल. हे पुस्तक वाचकांना भौतिक सुखांच्या पलीकडचा आनंद कसा मिळवायचा याचे विस्तृत मार्गदर्शन करते.

कथासंग्रहात एकूण १४ मार्मिक कथा असून, प्रत्येक कथा आपल्याला जगण्याचं नवीन भान देऊन जाते.

## श्रद्धांजली

### अंजनी नरवणे




इंग्रजी आणि गुजराती भाषेतील दर्जेदार साहित्यकृती मराठीत आणणारं एक महत्त्वाचं नाव म्हणजे ज्येष्ठ अनुवादक अंजनी नरवणे.

दिनकर जोशी, ध्रुव भट्ट यांच्यासारख्या नामांकित लेखकांच्या दर्जेदार पुस्तकांचा अनुवाद असो किंवा प्रेरणादायी मार्गदर्शनपर लिखाण; अंजनी नरवणे यांनी नेहमीचं वाचकांच्या मनात विश्‍वासाचं स्थान मिळवलं. मेहता पब्लिशिंग हाऊससोबत गेली कित्येक वर्षे अनुवादाच्या माध्यमातून जोडली गेलेली लेखिका काळाच्या पडद्याआड जाण्याचा धक्का मोठा आहे.


त्यांच्या पुस्तकांमधून त्यांची स्मृती असंख्य वाचकांच्या मनात नेहमीच तेवत राहील यात तिळमात्र शंका नाही.

मेहता पब्लिशिंग हाऊसच्या संपूर्ण परिवाराच्या वतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.



**नवी संहिता... नवा आशय...**




# दोन शिंगे असलेला ऋषी

**सुधा मूर्ती**

अनुवाद

**लीना सोहोनी**

भारतीय लोकप्रिय लेखिका सुधा मूर्ती यांनी शब्दबद्ध केलेल्या भारतीय पुराणांमधल्या साध्या सोप्या, अतिशय प्रवाही आणि प्रत्ययकारी भाषेतल्या कथांचा संग्रह

**किंमत : २२०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# ॲम्नेस्टी

**अरविंद अडिगा**

अनुवाद

**सुनीता कट्टी**

बेकायदीशीररीत्या स्थलांतरीत झालेला नायक जेव्हा मालकिणीच्या खुनाचा साक्षीदार होतो त्यावेळी त्याच्यावर ओढवलेल्या पेचप्रसंग आणि मायदेशी रवाना होण्याचा धोका याचा व्यामिश्रतेने वेध घेणारी कादंबरी

**किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## १६ जून ते १५ जुलै २०२२ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३० जून दरम्यान खास सवलत**

**१६ जून - जागतिक पितृदिन**
'चिकन सूप फॉर द फादर्स सोल, भाग - १', 'चिकन सूप फॉर द फादर्स सोल, भाग - २', 'चिकन सूप फॉर द सोल इंडियन फादर्स','चिकन सूप फॉर द सोल इंडियन फादर्स भाग २','चिकन सूप फॉर द फादर ॲन्ड सन सोल, भाग - १', 'चिकन सूप फॉर द फादर ॲन्ड सन सोल, भाग - २', 'चीपर बाय दी डझन', 'वपु', 'वपु सांगे वडिलांची कीर्ती', 'पितृऋण' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १७०५/- । सवलत किंमत १०६९/-**

---

**१७ जून - ना. रा. वडनप यांचा जन्मदिन**
'बुद्धिबळ शिका', 'बुद्धिबळाचा ओनामा', 'बुद्धिबळाचा श्रीगणेशा', 'चतुरंग (बुद्धिबळातील) सापळे', 'सुसंघटित मारा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७९५/- । सवलत किंमत ४९९/-**

---

**१७ जून - संत कबीर यांचा जन्मदिन**
'भक्तीत भिजला कबीर', 'म्हणे कबीर दिवाणा', 'मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही!', 'साद घालतो कबीर', 'ऐका संतांनो', 'प्रेमरस... कबीरांचा!' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १०६५/- । सवलत किंमत ६७९/-**

---

**१९ जून - बेबी हालदार यांचा जन्मदिन**
'आलो-आंधारि' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-**

---

**२० जून - रॉबर्ट क्रेस यांचा जन्मदिन**
'द वॉचमन' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १७९/-**

**२१ जून - स्वाती चांदोरकर यांचा जन्मदिन**
'अनाहत', 'आणि विक्रमादित्य हरला!', 'सेलिब्रेशन', 'दहाव्या रांगेतून', 'एक पायरी वर', 'फॉरवर्ड अँड डिलिट', 'गोल गोल राणी', 'हिज डे', 'काळाकभिन्न', 'पवित्रम्', 'शेष', 'उत्खनन', 'वपु', 'युथनेशिया', या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २६३०/- । सवलत किंमत १४९९/-**

**२१ जून - जागतिक संगीत दिन**
'मायकल जॅक्सन : एक जादू आणि बेधुंदी!', 'मंद्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १२६५/- । सवलत किंमत ७१९/-**

**२१ जून - जागतिक योगा दिन**
**संच १** - 'आपण आपले ताणतणाव - एक चिंतन', 'आरोग्यासाठी योग', 'पाठदुखी घालविण्यासाठी योगसाधना', 'फिट फॉर ५०+ फॉर विमेन', 'ची रनिंग', 'ध्यानसूत्र', ''स' सुखाचा!', 'चिंता सोडा सुखाने जगा', 'पाणी : एक अद्‌भुत उपचारपद्धती', 'धन्वंतरी घरोघरी', 'चला जाणून घेऊ या! चालणे', 'हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र', 'HEALTHY HABITS FOR A FIT FAMILY' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २२७०/- । सवलत किंमत १३९९/-**

**संच २ -** 'निरामय यशासाठी ध्यान', 'द माइंड जिम', '२० मिनिटे तंदुरुस्तीसाठी', 'स्थूलतेला करा टाटा', 'स्वत:चा शोध', 'अर्थाच्या शोधात', 'मनावर विजय', 'एकच पेला शिवाम्बूचा', 'चला जाणून घेऊ या! तंदुरुस्ती', 'चला जाणून घेऊ या! आयुर्वेदाद्वारे आहार आणि आरोग्य', 'पीस, लव्ह ॲन्ड हीलिंग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १७९०/- । सवलत किंमत ११४९/-**

**संच ३ -** 'चिंतामुक्त जीवन', 'कार्यमग्न, व्यस्त लोकांसाठी योगसाधना', 'सर्व वयोगटांसाठी योगसाधना आणि ध्यानधारणा', 'फिट फॉर ५०+ फॉर मेन', 'हसत-खेळत ध्यानधारणा', 'प्रिझनर्स ऑफ अवर थॉट्स', 'सुंदर मन', 'अन्नपुराण–आयुर्वेदिक, आधुनिक', 'लव्ह, मेडिसिन आणि मिरॅकल्स', 'चला जाणून घेऊ या! योगविद्या', 'सौंदर्य आणि तारुण्य टिकविण्यासाठी योगसाधना', 'THE ART OF AGEING' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २०५०/- । सवलत किंमत १३४९/-**

---

**२२ जून - डॅन ब्राऊन यांचा जन्मदिन**

'एन्जल्स ॲण्ड डेमन्स', 'डिसेप्शन पॉईंट', 'डिजिटल फॉर्ट्रेस', 'द दा विंची कोड', 'द लॉस्ट सिम्बॉल', 'इन्फर्नो', 'ओरिजिन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३७८०/- । सवलत किंमत २२८९/-**

---

**२२ जून - महादेव मोरे यांचा जन्मदिन**

'चेहऱ्यामागचे चेहरे', 'चिताक', 'एकोणिसावी जात', 'माणसं – अशीही', 'मत्तीर', 'झोंबडं' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १२४५/- । सवलत किंमत ७४९/-**

---

**२५ जून - सुधा रिसबूड यांचा जन्मदिन**

'अंतरिक्षाचा वेध', 'गार्डिअन', 'कल्पित-अकल्पित', 'रिचर्ड फाईनमन : एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७८०/- । सवलत किंमत ४९९/-**

---

**२५ जून - शशी पाटील यांचा जन्मदिन**

'एकच पेला शिवाम्बूचा' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १०९/-**

---

**२६ जून - छत्रपती शाहू महाराज जयंती**

'छत्रपती राजर्षी शाहू महाराज', 'राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा', 'राजर्षी शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे', 'राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे', 'राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे', 'राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे', 'राजर्षी शाहू छत्रपती : एक अभ्यास', 'समाज

क्रांतिकारक राजर्षी शाहू छत्रपती' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १६९५/- । सवलत किंमत ११००/-**

**२६ जून - पर्ल बक यांचा जन्मदिन**
'काळी' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १४९/-**

**२७ जून - राम प्रधान यांचा जन्मदिन**
'पहिली फेरी?(१९६५ भारत-पाक युद्ध)', 'वादळ माथा ते १९६५ भारत-पाक युद्ध', 'माझी वाटचाल : मेटकॉफ हाउस ते राजभवन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १०४५/- । सवलत किंमत ६४९/-**

**२७ जून - ई. आर. ब्रेथवेट यांचा जन्मदिन**
'टू सर, विथ लव्ह' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १०९/-**

**३० जून - दिनकर जोषी यांचा जन्मदिन**
'अ-मृत पंथाचा यात्री', 'अंकरहित शून्याची बेरीज', 'अयोध्येचा रावण आणि लंकेचा राम', 'कालपुरुष', 'महाभारतातील मातृवंदना', 'महाभारतातील पितृवंदना', 'सुरमयी सूर्यास्त', 'रामायणातील पात्रवंदना', 'ईथे कुणी नाही' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १९५०/- । सवलत किंमत १२१९/-**

**३० जून - करण बजाज यांचा जन्मदिन**
'कीप ऑफ द ग्रास' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-**

**खालील संचांवर १ ते १५ जुलै दरम्यान खास सवलत**

**१ जुलै - जागतिक विनोद दिन**
'कसं बोललात! भाग १ ते ७', 'हसाल तर वाचाल', 'फुकट', 'खुमासदार अत्रे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०३५/- । सवलत किंमत ५९९/-**

**१ जुलै - मीना कर्णिक यांचा जन्मदिन**

'अरुणाची गोष्ट' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १०९/-**

**२ जुलै - जागतिक UFO दिन**

'पृथ्वीवर माणूस उपराच!', 'देव? छे! परग्रहावरील अंतराळवीर!', 'अंतराळवीर सुनीता विल्यम्स', 'स्वप्नाकडून सत्याकडे...(कल्पना चावलाची कहाणी)' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४७०/- । सवलत किंमत ३१९/-**

**४ जुलै - योगिनी वेंगुर्लेकर यांचा जन्मदिन**

'शत्रूशी दोन हात' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४००/- । सवलत किंमत २४९/-**

**४ जुलै - जीन सॅसन यांचा जन्मदिन**

'ग्रोईंग अप बिन लादेन', 'मयादा - इराकची कन्या', 'युवराज्ञी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८७०/- । सवलत किंमत ४९९/-**

**६ जुलै - रेखा बैजल यांचा जन्मदिन**

'अज्ञेय', 'प्रस्थान' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १६९/-**

**११ जुलै - रिमल चंगेडे यांचा जन्मदिन**

'आजचा मेनू' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १०९/-**

**११ जुलै - झुंपा लाहिरी यांचा जन्मदिन**

'द नेमसेक' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २७०/- । सवलत किंमत १४९/-**

**११ जुलै - जेन गार्डम यांचा जन्मदिन**
'द मॅन इन द वुडन हॅट' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३००/- । सवलत किंमत १७९/-**

**१२ जुलै - जागतिक मलाला दिन**
'मी मलाला' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १४९/-**

**१३ जुलै - माधुरी शानभाग यांचा जन्मदिन**
'जेआरडी : एक चतुरस्त्र माणूस', 'स्वप्नाकडून सत्याकडे... (कल्पना चावलाची कहाणी)', या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-**

**१३ जुलै - बाजीप्रभू बलिदान दिन**
'पावनखिंड', 'श्रीमानयोगी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७२५/- । सवलत किंमत ४७९/-**


**१५ जुलै - अनंतराव खरात यांचा जन्मदिन**
'शर्यती-स्पर्धा-खेळ' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**


**किमतींमध्ये बदलाची शक्यता**


**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**
**website : www.mehtapublishinghouse.com**
**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.**
**author@mehtapublishinghouse.com**


नवी संहिता... नवा आशय...

**अम्माबरोबरच्या सहली छान छान...**
**देखणी चित्रं अन् माहिती मौल्यवान**





- अम्मा, चल **तिरुपतीला** जाऊ!
- अम्मा, मला सलीम चिश्तींच्या **दर्ग्याला** घेऊन चल!
- अम्मा, मला **शिर्डीला** घेऊन चल!
- अम्मा, मला **सुवर्णमंदिर** दाखव




**लेखक : भक्ति माथुर**
**अनुवाद : डॉ. वृषाली पटवर्धन**
किंमत प्रत्येकी : रु. १९५
पोस्टेज अतिरिक्त
ई-बुक उपलब्ध

**देशाच्या आर्थिक राजधानीत**
**खळबळ माजवणाऱ्या घटनेचा नाट्यमय थरार**

# क्रिमिनल्स इन यूनिफॉर्म

लेखक : **संजय सिंग । राकेश त्रिवेदी**
अनुवाद : **मुकुंद कुळे**




**किंमत - ₹३५० । पोस्टेज - ₹५०**

Book Available

'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023


RNI. No. MAHMAR/2000/02739

Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.

Publication Date : 11/06/2022 Posting Date : 11/06/2022


## नवीन संहिता... नवा आशय...



















**मेहता मराठी ग्रंथजगत**

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, ____________________